# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १९८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.०५ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## गाडीच्या बोनेटवर बसवून गुन्हेगारांची धिंड काढणाऱ्या पुणे पोलिसांना राज्य मानवाधिकार आयोगाची नोटीस

पुणे दि.४ (प्रतिनिधी)- पुण्याच्या पोलीस विभागासंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. गाडीच्या बोनेटवर बसून आरोपीची धिंड काढणं पुणे पोलिसांना आता चांगलंच महागात पडल्याचे समोर आलं आहे. राज्य मानवाधिकार आयोगाकडून पुणे पोलिसांना दणका दिला असल्याचे बोललं जात आहे. खून प्रकरणातील संशयीतांची जाहीर दिंड काढल्या प्रकरणी राज्य मानवाधिकार आयोगाकडून मुख्य सचिव डीजीपीसह पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना नोटीस पाठवण्यात आली आहे. पुणे पोलिसांच्या या प्रतापाला राज्य मानवाधिकार आयोगाकडून जंगल राज असा उल्लेख करण्यात आला आहे. दरम्यान, जुलै महिन्यात एका तरुणाची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी चार संशयीतांना अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी या चारही जणांची गाडीच्या बोनेटवर बसवून दिंड काढली. सोबतच गुडघ्यावर चालायला सांगून त्यांना मारहाण देखील केली. त्यावेळी ज्या तरुणाची हत्या झाली त्याच्या कुटुंबीयांनी या संशयितांना चपलेने मारल्याचे देखील व्हिडीओमध्ये दिसत आहे. अशातच, या संपूर्ण प्रकरणाची राज्य मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली आणि पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, झोन दोनचे डीसीपी, आणि भारती विद्यापीठाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना नोटिसा बजावण्यात आले आहे. पुणे पोलिसांना या संपूर्ण कारवाईचा अहवाल २० ऑगस्टपर्यंत सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या प्रकरणी पुढे नेमकं काय होतं, हे पाहणे म्हणत्वाचे ठरणार आहे.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेत आता महिला आणि भूमिहीनांनाही लाभ

### राज्य मंत्रिमंडळाचे निर्णय; सिल्लोडसह राज्याला मिळाली नवीन न्यायालये

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत कृषी, ऊर्जा, सामान्य प्रशासन तसेच विधी आणि न्याय विभागाशी संबंधित अनेक मोठे आणि जनहिताचे निर्णय घेण्यात आले. विशेषतः राज्यातील शेतकरी, माहिती अधिकार कार्यकर्ते आणि न्यायाव्यावस्थेच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोडसह राज्याच्या विविध भागांत नवीन न्यायालये स्थापन करण्याच्या निर्णयालाही आज मंजुरी देण्यात आली.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी आधारवड ठरलेल्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेला आणखी ३ वर्षांची मुदतवाढ देण्याचा मोठा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे. या योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली असून, आता यामध्ये भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. महिला शेतकरी सक्षमीकरण कायद्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने हा दिलासादायक निर्णय घेतला आहे.

माहिती अधिकाराखालील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा वेगाने व्हावा यासाठी, महाराष्ट्र राज्य माहिती आयोगात राज्य माहिती आयुक्तांची आणखी ३ नवीन पदे निर्माण करण्यास सामान्य प्रशासन विभागाने मंजुरी दिली आहे. या नव्या आयुक्तांच्या कार्यालयासाठी आवश्यक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पदेही नव्याने भरली जाणार आहेत. राज्याच्या विविध भागांतील, विशेषतः मराठवाड्यातील नागरिकांना जलद आणि सोयीस्कर न्याय मिळावा यासाठी विधी आणि न्याय विभागांतर्गत नवीन न्यायालयांना मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी आवश्यक न्यायिक अधिकारी, कर्मचारीवृंद आणि आर्थिक तरतुदीलाही कॅबिनेटने मान्यता दिली आहे.

सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर, किनवट, जि. नांदेड, केज, जि. बीड, चांदवड, जि. नाशिक, पिंपरी-चिंचवड, जि. पुणे या ठिकाणी नव्याने न्यायालय स्थापन करण्याचे शासनाकडून सांगण्यात आले.

## स्पर्धा परीक्षा आणि सीईटी प्रक्रियेमध्ये मोठा घोटाळा; रोहित पवारांचा दावा

### मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराने विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात; विखे पाटलांच्या राजीनाम्याची मागणी




मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- स्पर्धा परीक्षा आणि सीईटी प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून, यात मंत्री आणि अधिकारी सामील असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी शिक्षण क्षेत्रातील टेंडर घोटाळा, सीईटीमधील पर्सेंटाईल घोळ आणि व्हीआयपी मुलांना मिळणारे बोगस गुण यावर पुरावे सादर करत सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. तसेच या संपूर्ण भ्रष्टाचाराप्रकरणी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी करत, विद्यार्थ्यांच्या हितासाठी पुण्यात भव्य मोर्चा काढण्याचा इशारा त्यांनी दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार म्हणाले की, "दहावी आणि बारावीमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी पूर्वी सीईटीमध्येही उत्तम गुण मिळवायचे. मात्र, २०२३ नंतर यामध्ये अचानक मोठी तफावत दिसून येऊ लागली आहे. एकाच घरातील आणि एकाच केंद्रावरील मुलांना समान पर्सेंटाईल मिळणे किंवा २०० पैकी १०४ गुण मिळूनही विद्यार्थ्यांचे पर्सेंटाईल केवळ ९ येणे, हे सामान्य नाही. या प्रक्रियेत मोठा घोळ असून नॉर्मलायझेशन आणि पर्सेंटाईलच्या नावाखाली विद्यार्थ्यांची फसवणूक केली जात आहे."

शिक्षण विभागातील टेंडर प्रक्रियेवर ताशेरे ओढताना रोहित पवार म्हणाले की, "टीसीएस सारख्या नामांकित कंपनीचे सर्वात कमी रकमेचे (१) टेंडर तीनदा रद्द करून एडुस्पार्क नावाच्या एकाच मालकाच्या वेगवेगळ्या मित्र कंपन्यांना कोट्यवधी रुपयांची कंत्राटे देण्यात आली. विशेष म्हणजे, याच कंपनीच्या भ्रष्टाचाराबाबत बिहार सरकारने तपास करून पंतप्रधान कार्यालयाला अहवाल पाठवला होता आणि त्यात महाराष्ट्राचाही संदर्भ आहे. असे असतानाही, राज्य सरकारने यावर कोणतीही कारवाई केली नाही. यात राज्याचे संबंधित मंत्री आणि अधिकारी थेट गुंतलेले आहेत."

"गरीब आई-वडील कष्टाचे पैसे गोळा करून मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करतात. मात्र, काही लाखांची ऑफर देऊन सेंटर्स मॅनेज केले जातात आणि पैशांच्या जोरावर श्रीमंतांची मुले चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळवतात. याउलट, कष्टकरी व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांच्या हाती निराशा येते. पोलीस भरतीतील बनावटगिरी असो किंवा परीक्षांमधील घोटाळे, राज्यामध्ये सध्या नेत्यांचे आणि अधिकाऱ्यांचे घर भरण्याचे काम सुरू आहे," असा घणाघात त्यांनी केला.

विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या या भ्रष्टाचाराविरोधात लवकरच पुण्यात महामोर्चा काढण्यात येणार असल्याचे रोहित पवार यांनी स्पष्ट केले. यामध्ये एमपीएससीची परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात यावी, सीईटी आणि प्राध्यापक भरतीमधील घोटाळ्यांची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी त्यांनी केली. या लढ्यात सर्वपक्षीय नेते, सामाजिक संघटना आणि विद्यार्थ्यांना एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## राम मंदिरातील दानपेटी रक्कम चोरीच्या मुद्यावरून संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या १२ व्या दिवशी, राम मंदिरातील दानपेटीतील रक्कम चोरीला गेल्याच्या मुद्द्यावरून दोन्ही सभागृहांमध्ये मोठा गदारोळ झाला. मंगळवारी लोकसभेचे कामकाज केवळ १९ मिनिटे चालले. या काळात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर सुधारणांशी संबंधित विधेयके मांडली. त्यानंतर सभागृहाचे कामकाज बुधवारपर्यंत तहकूब करण्यात आले.

राज्यसभेचे कामकाज दिवसभरात दोनदा तहकूब करण्यात आले. सकाळी ११:०० वाजता कामकाज सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाच्या आतच ते तहकूब करावे लागले. दुपारी १२:०० वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले, परंतु ते केवळ २० मिनिटे चालले. त्यानंतर दुपारी २:०० वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले.

तत्पूर्वी, राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यात खडाजंगी झाली. खर्गे यांनी सांगितले की, राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची स्थापना केंद्र सरकारने केली होती आणि सरकारनेच या ट्रस्टला ७० एकरांहून अधिक जमीन हस्तांतरित केली होती. त्यांनी नमूद केले की, राम मंदिराशी संबंधित प्रत्येक कार्यक्रमात खुद्द पंतप्रधान सहभागी झाले होते. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, आता ईडी, सीबीआय (पान ४ वर)

## पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन; शिक्षण, राजकारण, सहकारातील धुरंधर हरपला



कोल्हापूर दि.४ (प्रतिनिधी)- पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंतराव तथा डॉ. डी. वाय. पाटील यांचे मंगळवारी निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. ते ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी आणि बिहार, त्रिपुरा व पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल होते. महाराष्ट्रामध्ये शिक्षणसम्राट ह्या उपाधीने ओळखल्या जाणाऱ्या डी. वाय.पाटील ह्यांना १९९१ साली पद्मश्री हा पुरस्कार देण्यात आला होता. त्यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूरमधील अंबप गावात झाला होता. कोल्हापूरच्या मातीतले रांगडे व्यक्तिमत्त्व होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य असलेले डी.वाय. पाटील १९५७ ते १९६२ दरम्यान कोल्हापूर शहराचे महापौर होते. १९६७ व १९७२ साली ते पन्हाळा विधानसभा मतदारसंघामधून विधानसभेवर निवडून आले होते. सर्वसामान्य कार्यकर्त्यांपासून सुरु केलेली राजकीय कारकीर्द पुढे अनेक मोठमोठ्या पदांपर्यंत घेऊन गेली. कार्यकर्ता, महापौर ते अगदी राज्याचे राज्यपाल, असा विस्मयचकित करणारा प्रवास डॉ. डी. वाय पाटील यांचा आहे.

भाजपप्रणित एनडीए सरकार केंद्रात सत्तेत आल्यानंतर अनेक राज्यातील राज्यपालांची उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या ठिकाणी नवे राज्यपाल नियुक्त करण्यात आले. मात्र, राजकारणाच्या पलिकडचे व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. डी. वाय. पाटील यांचे राज्यपालपद कायम ठेवण्यात आले होते. तेव्हा डॉ. डी. वाय. पाटील हे बिहारचे राज्यपाल होते.

देश-विदेशात शिक्षण आणि वैद्यकीय संस्था, तसेच नवी मुंबईतील खेळाचे भव्य मैदान असो, ज्या क्षेत्रात पाऊल ठेवले. तिथे ठोस कामगिरी करत आपल्या नावाचं ब्रँड तयार केले. डी.वाय. पाटील ह्यांच्या नावाच्या अनेक संस्था महाराष्ट्रात आहेत. त्यामध्ये पद्मश्री डी.वाय. पाटील विद्यापीठ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, आंबी या विद्यापीठांचा समावेश आहे.

शेकडो शिक्षण संस्थांचेव्यापक नेटवर्क असलेला व गुणवत्तेमुळेराज्यातच नव्हे, तर देशभरात ओळखला जाणारा डी. वाय. पाटील ग्रुप शैक्षणिक वटवृक्ष बनला आहे. ग्रुपच्या विविध संस्थांमधून शिक्षण घेऊन बाहेर पडलेलेलाखो विद्यार्थी आज देश-विदेशांत उच्चपदावर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याला आकार देतानाच परंपरा जतन करून सुजाण नागरिक बनवण्यासाठी ग्रुपतर्फे नेहमीच प्रयत्न केला जातो.

## राज्यात पावसाचा जोर ओसरला; मराठवाड्यात पावसाची प्रतीक्षा कायम, शेतकरी चिंतेत

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- गेले काही दिवस राज्याला झोडपून काढणाऱ्या मान्सूनने आता बहुतांश भागांत ब्रेक घेतल्याचे चित्र आहे. राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर ओसरला असून काही ठिकाणी उघडीप मिळाली आहे. मात्र, असे असले तरी आज ४ ऑगस्ट (मंगळवार) रोजी विदर्भातील काही जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. उर्वरित राज्यात ढगाळ वातावरण आणि हलक्या सरींची शक्यता आहे.

राज्यात पावसाचा जोर कमी झाला असला तरी विदर्भाला मात्र पावसाचा तडाखा बसणार आहे. हवामान विभागाने बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यांमध्ये मंगळवारी विजांच्या कडकडाटासह आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसाची शक्यता आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांच्या घाटमाथा परिसरात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता असून, या भागांसाठीही यलो अलर्ट देण्यात आला आहे. मात्र, याच जिल्ह्यातील सपाटीच्या भागांसह अहिल्यानगर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये केवळ हलका ते (पान ४ वर)

## केजरीवालांनी पंतप्रधान निवासस्थानापर्यंत मोर्चा काढला; पोलिसांनी रोखले

### ई२० विरोधात २ लाख लोकांचे पत्र देणार-केजरीवाल

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- ई२० इंधनाच्या विरोधात निषेध करण्यासाठी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी मंगळवारी पंतप्रधान निवासस्थानाकडे मोर्चा काढला. मात्र, दिल्ली पोलिसांनी केजरीवाल, मनीष सिसोदिया, जस्मिन शाह आणि पक्षाच्या इतर नेत्यांना फिरोजशाह रोडवरच अडवले.

त्यानंतर, केजरीवाल आणि आपच्या इतर नेत्यांनी फिरोजशाह रोडच्या मध्यभागीच ठिय्या आंदोलन केले. आपने सुमारे १०० नेते आणि कार्यकर्त्यांसह हा मोर्चा आयोजित केला होता. देशभरातील २.३० लाखांहून अधिक लोकांकडून निवेदने गोळा केल्याचा दावा पक्षाने केला आहे; ही निवेदने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर करायची होती.

मोर्चादरम्यान केजरीवाल यांनी सांगितले की, २ लाखांहून अधिक लोकांनी ई२० इंधनाला विरोध करणारी पत्रे पंतप्रधानांना लिहिली आहेत आणि त्यांना ती पत्रे स्वतः पंतप्रधानांच्या हाती सोपवायची आहेत. केजरीवाल यांनी पंतप्रधानांना संदेश पाठवल्याचे नमूद केले आणि "पंतप्रधान आम्हाला भेटतील अशी आम्हाला आशा आहे," असेही ते म्हणाले.

दिल्ली आपचे अध्यक्ष सौरभ भारद्वाज म्हणाले, "आम्ही २ लाखांहून अधिक लोकांची निवेदने सोबत आणली आहेत. आम्हाला पुढे जाण्याची परवानगी दिली जावी. जर काही अडचण असेल, तर पंतप्रधान कार्यालयातील एका अधिकाऱ्याने येथे येऊन निवेदन स्वीकारावे आणि या विषयावर चर्चा करण्यास सहमती दर्शवावी." मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्याबाबतही प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, "इतक्या मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी, आरएएफ तुकड्या, लाठ्या आणि ढाली पाहून आश्चर्य वाटते. आम्ही केवळ लोकांची पत्रे पंतप्रधानांपर्यंत पोहोचवण्यासाठी आलो आहोत असे सौरभ भारद्वाज यांनी म्हटले आहे.

## राजीनामा देण्याचा प्रयत्न केला तर क्षणात स्वीकारेन, मुख्यमंत्री डीके शिवकुमार यांची स्वपक्षीय आमदारांना तंबी

बंगळुरू दि.४ (वृत्तसंस्था)- कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर डीके शिवकुमार आता मंत्रिमंडळ विस्तार करण्याच्या तयारीत आहेत. आपल्यालाही मंत्रिमंडळात स्थान मिळावे, यासाठी काही ज्येष्ठ आमदार राजीनामा अस्त्र उगारून दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. राजीनामा देण्याच्या तयारीत असलेल्या आमदारांना मुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी एका वाक्यात सूचक इशारा दिला आहे. जर कुणी राजीनामा देण्याचा प्रयत्न केला तर तो मी क्षणात स्वीकारेल, असे विधान कर्नाटकचे मुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी केले आहे.

डीके शिवकुमार म्हणाले, "राजीनामा देणे हा राजकारणाचा भाग आहे. ज्याला राजीनामा द्यायचा आहे. त्यांना कुणी थांबवू शकत नाही. त्यांना राजीनामा द्यायचा असेल तर तो मी एका मिनिटात मंजूर करेन. जर त्यांना पक्ष आणि राजकारणात भविष्य घडवायचे असेल तर ते थांबतील."

डीके शिवकुमार यांनी स्वतःच्या राजकीय प्रवासाचा दाखला देत आमदारांना संयम बाळगण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "धर्म सिंह यांच्या काळात किंवा सिद्धरामय्या यांच्या काळात, तत्कालीन सर्व मंत्री मला बाजूला सारत होते. तेव्हा मी राजीनामा देऊ शकलो असतो. मी जी. परमेश्वर यांच्याबरोबरही काम करताना (पान ४ वर)

## श्रीकांत शिंदेंसह शिवसेना खासदारांनी घेतली अमित शाहांची भेट; चर्चेला उधान

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- ठाकरेंचे सहा खासदार फुटल्यानंतर आता त्यांच्या आमदारांवरही शिंदेंच्या शिवसेनेची नजर असल्याची चर्चा सातत्याने रंगतेय. त्यामुळेच राज्यात ऑपरेशन टायगरच्या तिसऱ्या टप्प्याला सुरूवात झाल्याची चर्चा दबक्या आवाजात असते. त्यालाच बळ देणारे पुरावे आता समोर आले आहेत. खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासह शिवसेना खासदारांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांची भेट घेतली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये शिवसेनेच्या खासदारांनी अमित शाहांची ही दुसऱ्यांदा भेट घेतली आहे.

खासदार श्रीकांत शिंदे, नरेश मस्के, नागेश पाटील आष्टीकर, संजय पाटील यांच्यासह विधान परिषदेचे नवनियुक्त उपसभापती सचिन अहिर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. ठाकरेंचे खासदार फुटल्यानतंर ही दुसरी भेट आहे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेकडून पक्षविस्तार सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर या खासदारांनी अमित शाहांची भेट घेतल्याने राज्यात पुन्हा एकदा ऑपरेशन टायगर सुरू होणार का, असा प्रश्न विचारला जात आहे.

दरम्यान, शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत मंगळवारी सुनावणी होणार होती. मात्र ती आता बुधवारी (५ ऑगस्ट) होणार आहे. बुधवारी दुपारी २ वाजता यासंदर्भातली सुनावणी सुरू होईल अशी माहिती आहे. त्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या खासदारांनी अमित शाहांची भेट घेतल्याने त्याचीही चर्चा रंगली आहे.

शिवसेना पक्ष आणि चिन्ह आपल्यालाच मिळणार, आणि जरी मिळालं नाही तरी ते गोठवलं जाणार, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत व्यक्त केला होता. त्यामुळे या सुनावणीकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर ठाकरेंची शिवसेना पहिल्यांदा फुटली. त्यानंतर जून महिन्यामध्ये शिंदेंनी ठाकरेंचं सहा खासदार फोडले. त्यामध्ये संजय पाटील, संजय जाधव, नागेश पाटील आष्टीकर, संजय देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे आणि ओमराजे निंबाळकर यांचा समावेश आहे. या सहा खासदारांनी आधी स्वतंत्र गट केला आणि लोकसभा अध्यक्षांनी त्याला मान्यता दिली. नंतर या सहा खासदारांच्या गटाने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला.

## अमेरिकेची जवळपास सगळी मिसाइल्स संपली

वॉशिंग्टन दि.४ (वृत्तसंस्था)- इराणविरुद्ध गेल्या पाच महिन्यांपासून सुरू असलेल्या भीषण लष्करी संघर्षात अमेरिकेच्या सैन्याने आपल्या ताकदीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे. मात्र, या युद्धाचाअमेरिका आणि पेंटागॉनला मोठा फटका बसला असून, अमेरिकन सैन्याकडील लांब पल्ल्याच्या आणि अचूक मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांचा मोठा साठा जवळजवळ संपुष्टात आला आहे. या तुटवड्यामुळे भविष्यातील लष्करी आव्हानांचा सामना करण्याच्या अमेरिकेच्या क्षमतेवर आणि युद्धसज्जतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अमेरिकन सैन्याकडे जमीनवरून जमिनीवर मारा करणाऱ्या 'आर्मी टॅक्टिकल क्षेपणास्त्र प्रणाली' आणि अत्यंत प्रगत अशा 'प्रिसिजन स्ट्राइक मिसाइल' चा मोठा साठा होता. या क्षेपणास्त्रांची किंमत प्रति नग १ दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त आहे. सुरक्षित अंतरावरून शत्रूच्या तळांवर अचूक निशाणा साधण्यासाठी ही शस्त्रे अत्यंत महत्त्वाची मानली जातात. युक्रेन युद्धातही या क्षेपणास्त्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती; परंतु इराण युद्धातील सततच्या वापरामुळे पॅंटागॉ नकडील हा साठा आता जवळपास रिकामा झाला आहे.

फेब्रुवारीच्या शेवटी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी (पान ४ वर)

## सुनेत्रा पवारांना 'गुंगी गुडिया' म्हणणाऱ्या काँग्रेसवर राष्ट्रवादीची बोचरी टीका

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वादाची ठिणगी पडली असून बीड दौऱ्यातील त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यामध्ये, आमदार धनंजय मुंडे बोलतात असताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार शांत बसलेल्या दिसत आहेत. त्यावरुन, काँग्रेसने सुनेत्रा पवार यांना गुंगी गुडिया म्हणत हिनवले, काँग्रेसने हा व्हिडिओ शेअर करत, सुनेत्रा पवार, अजून किती दिवस "गुंगी गुडिया" बनून राहतील? असा सवालही केला. आता, काँग्रेसच्या या टीकेला राष्ट्रवादी काँग्रेसकडून पलटवार केला जात आहे.

काँग्रेस लोकांपासून दूर गेली आहे, त्यामुळे असे विधान येत आहे. मी काँग्रेस पक्षाला इंदिरा गांधींचा फोटो देणार आहे. विरोधकांनी अशीच त्यांच्यावर टीका केली होती आणि त्याच खणकर पंतप्रधान झाल्याचा इतिहास आहे. काँग्रेस चांगल्या लोकांच्या हाती नाही, पराभव पचविता येत नाही अशी ही लोक आहेत, अशा शब्दात सुनेत्रा पवार यांच्याबद्दल महाराष्ट्र काँग्रेसने केलेल्या टीकेला राष्ट्रवादीने प्रत्युत्तर दिले आहे. सुनेत्रा वहिनी पवार या प्रत्येक आठवड्यात मुंबई पुण्यात पत्रकारांसोबत संवाद साधतात, बीडमदील ती पत्रकार परिषद होण्याआधी त्यांनी अनेक (पान ४ वर)

### सुनेत्रा पवारांवरील 'गुंगी गुडिया' टीकेचे हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडून समर्थन

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- समाजकारणात, राजकारणात आपल्यावर जर आरोप होत असतील त्यावर नेत्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांची उत्तर दिली पाहिजे. मात्र, ज्यांच्यावर गुंड म्हणून आरोप असणारा, ओळख असणारा एक व्यक्ती पत्रकारांना एकेरी भाषेमध्ये चूप बस बोलत आहे. मात्र, तिथं उपमुख्यमंत्री काही बोलत नाही, त्यांच्यासमोर पत्रकारांना चूप बसविले जाते, हे लोकशाही आणि सामाजिक जीवनाला न शोभणारं आहे. त्यामुळे, त्यांनी तिथं जी भूमिका निभावली त्याला अनुसरुन हा गुंगी गुडिया शब्द आहे, असे स्पष्टीकरण हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेसच्या ट्विटबद्दल दिले.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी राज्यपाल डी.वाय. पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन झाले, वयाच्या ९० व्या वर्षी त्यांनी कोल्हापुरात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानंतर देशभरातील राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया येत असून महाराष्ट्र काँग्रेसनेही दुःख व्यक्त केलं आहे. डी.वाय. पाटील यांच्या निधनामुळे काँग्रेसने एक मोठा नेता, शिक्षणमहर्षी हरपला, त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची तसेच काँग्रेस पक्षाची मोठी हानी झाल्याची प्रतिक्रिया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. तसेच, डी.वाय. पाटील यांच्या निधनानंतर काँग्रेस पक्ष तीन दिवसाचा दुखवटा पाळणार असल्याचंही त्यांनी जाहीर केलं. यावेळी, काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांचा उल्लेख गुंगी गुडिया केल्याबद्दलही सपकाळ यांनी स्पष्टीकरण दिलं.

## ट्विटरवरुन पोस्ट हटवा, माफी मागा; तटकरेंचा काँग्रेसला इशारा

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- राज्यात राष्ट्रवादीच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर टीका करताना काँग्रेसने गुंगी गुडिया असा शब्द वापरल्याने राष्ट्रवादीने तीव्र संताप व्यक्त केला आहे. राष्ट्रवादीचे समर्थक कार्यकर्ते, काँग्रेसच्या मुंबईतील कार्यालयात घुसले होते, विशेष म्हणजे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच राष्ट्रवादीने निषेध आंदोलन केले. तर, सपकाळ यांनी या टीकेचं समर्थन करत, सुनेत्रा पवारांनी कृतीतून दाखवून द्यावे, असे म्हटले. आता, काँग्रेसच्या या टीकेवरुन राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनीही काँग्रेसला लक्ष्य करत थेट इशारा दिला आहे. तसेच, संबंधित ट्विट हटवण्याचीही मागणी केलीय

महाराष्ट्राच्या माननीय उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांचा अपमान खपवून घेणार नाही. काँग्रेसने केलेल्या अपमानकारक पोस्टबद्दल महाराष्ट्रातील महिलांची व सुनेत्रावहिनींची यांची जाहीर माफी मागावी, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी ट्विट करुन इशारा (पान ४ वर)

## बांकीपूर, दतियाचे निकाल भाजपसाठी धोक्याची घंटा?

सध्या देशातील वातावरण कॉक्रोच पार्टीने केलेले जंतर मंतर वरील आंदोलन, संसदेवर मोर्चा आणि पोलिसांची कारवाई यांनी ढवळून निघाले आहे. त्यातच संसदेत व संसदेबाहेर रोज गदारोळ होत आहे त्यांनी हेडलाईन्स व्यापून टाकल्या आहेत. पण या गदारोळातच ३० जुलैला बिहार, मध्य प्रदेश व गुजरात राज्यात विधान सभेच्या प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक झाली. या पोटनिवडणुकांचे निकाल ३ ऑगस्टला लागले.

गुजरातमध्ये मांजलपूरची पोटनिवडणूक जिंकून भाजपने ती जागा आपल्याकडे राखली. मध्य प्रदेश मध्ये दतियाची जागा काँग्रेसने आपल्याकडे ठेवण्यात यश मिळवले. बिहारमध्ये बांकीपूर मतदारसंघात मात्र प्रशांत किशोर यांनी भाजपचा धक्कादायक पराभव करून ती जागा खेचून आणली. प्रशांत किशोर यांनी आपल्या जनसुराज्य पक्षातर्फे ही जागा लढवली होती. त्यांना काँग्रेसने पाठिंबा दिला होता. राष्ट्रीय जनता दलाचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला.

वरील ३ निकालांपैकी बंकीपूरचा निकाल भाजपची झोप उडवणारा आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी भाजपच्या अध्यक्षपदी निवड झाल्यावर बांकीपूरच्या जागेचा राजीनामा दिल्याने तिथे पोटनिवडणूक झाली. या जागेवर नितीन नबीन सलग ५ वेळा निवडून आले होते. त्यापूर्वी त्यांचे वडील या जागेवर निवडून येत असत. १९९५ पासून सलग ही जागा भाजपकडे होती. अशा बालेकिल्ल्यात झालेला पराभव भाजपच्या निश्चितच जिव्हारी लागला असेल. असेल. त्यातून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वतःचा गड राखू शकले नाहीत हा संदेश या निकालातून गेला आणि असा संदेश जाणे भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या गरिम्याला धक्का लावणारा आहे.

प्रशांत किशोर यांचा बांकीपूरचा विजय अधिक लक्षवेधक व भविष्यातील राजकारणाची दिशा दाखवणारा ठरू शकतो. केवल ९ महिन्यापूर्वी झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत जनसुराज्य पक्षाचा धुव्वा उडाला होता. त्यांना एकही जागा मिळाली तर नाहीच शिवाय बहुतांशी मतदारसंघात त्यांचे डिपॉझिटही जप्त झाले होते. ती निवडणुक प्रशांत किशोर यांनी लढवली नव्हती.या पार्श्वभूमीवर त्यांचा भाजपच्या बालेकिल्ल्यातील विजय बिहारच्या भविष्यातील बदलाचे संकेत तर देत नाही ना?

नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत तामिळनाडूत द्रविड मुन्हेत्र कळघम पक्षाचा अनपेक्षित पराभव होऊन विजय जोसेफ या 'नटाने ' केवल दोन वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या टी व्ही के पक्षाला जनतेने पसंती दिली व सर्वात मोठा पक्ष या नात्याने इतर पक्षांच्या मदतीने विजय तामिळनाडूचा मुख्यमंत्री बनला. तामिळनाडूत जनतेने द्रविडी पक्षांची मिरासदारी मोडून काढली तशीच बिहारमधील जनता दल व भाजप यांची मक्तेदारी मोडीत काढून पुढील विधानसभा निवडणुकीत मतदार प्रशांत किशोर यांना पसंती देऊन काही चमत्कार घडवतील का? हा उत्सुकतेचा विषय राहील.बंकीपूरचा विजय हा त्या दृष्टीने भविष्यातील बदलाची नांदी आहे का?

बिहारमध्ये नुकतेच सत्तान्तर होऊन नितीश कुमार दिल्लीला राज्यसभेत गेले आणि भाजपचे सम्राट चौधरी बिहारचे भाजपचे पहिले मुख्यमंत्री बनले. सम्राट चौधरीनी मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यावर झालेल्या पहिल्याच पोटनिवडणुकीत झालेला पराभव चौधरी यांच्यासाठीही एक अपशकून म्हणता येईल.

अर्थात बंकीपूरचा पराभव भाजपसाठी अगदीच अनपेक्षित नसेल. भाजपने उमेदवार निवडीत घातलेला गोंधळ या पराभवाला प्रामुख्याने जबाबदार आहे. प्रथम ज्या उमेदवाराला तिकीट देण्यात आले त्याला उमेदवारी अर्ज भरल्यानंतर अर्ज मागे घेण्यास सांगण्यात आले आणि त्या जागी दुसरा उमेदवार उभा केला गेला. पहिल्या उमेदवाराचे आई वडील चारा घोटाळ्यात दोषी ठरले होते हे उमेदवारी दिल्यानंतर लक्षात आले म्हणून त्याची उमेदवारी रद्द केली गेली. यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. त्यातच प्रशांत किशोर याना तुल्यबल लढत देईल असा उमेदवार भाजपकडे नव्हता. नितीन नबीन यांनी कार्यकर्त्यांची दुसरी फळी तयार केली नाही असा याचा अर्थ निघतो.प्रशांत किशोर यांच्यासारखा तगडा ब्राह्मण उमेदवार मिळाल्यावर भाजपची हक्काची उच्चवर्णीय मते त्यांच्याकडे वळली असण्याची शक्यता आहे. तसेच तरुणांनी सुद्धा प्रशांत किशोर यांच्यावर विश्वास दाखवलेला दिसतो.

मध्य प्रदेश मधील दतिया मतदारसंघात तर कहरच झाला. शिस्तबद्ध पक्ष या भाजपच्या प्रतिमेला पूर्णपणे काळिमा फासणारा घटनाक्रम येथे घडला. या मतदारसंघात २००८ पासून भाजपचे नरोत्तम मिश्रा हे बडे नेते निवडून येत असत. मात्र २०२३ च्या निवडणुकीत त्यांचा काँग्रेसच्या उमेदवाराने पराभव केला त्यावेळी मिश्रा राज्याचे गृहमंत्री होते.काँग्रेसच्या आमदाराची निवड रद्द ठरल्याने ही जागा रिकामी झाली. तेव्हापासून आपली उमेदवारी गृहित धरून मिश्रा हे तयारीला लागले. पण ऐन वेळी त्यांचे तिकीट कापण्यात आले आणि आशुतोष तिवारी यांना भाजपची उमेदवारी मिळाली. यावरून मिश्रा यांचे कार्यकर्ते प्रचंड आक्रमक झाले आणि त्यांनी हाय वे रोखून धरणे, टायर जाळणे, पोलिसांवर हल्ला करणे, दगडफेक करणे अशी हिंसक कृत्ये केली. नंतर पक्षश्रेष्टीनी तात्पुरता समेट घडवून आणला आणि मिश्रा यांनी तिवारी यांना पाठिंबा जाहीर केला. पण मिश्रा यांच्या दुखावलेल्या समर्थकांनी आशुतोष तिवारी यांना दगाफटका केलेला दिसतो.

बिहार व मध्य प्रदेश या दोन्ही राज्यात भाजप सत्तेत असून सुद्धा त्यांचा पराभव झाला.बांकीपूर व दतिया येथील पराभव भाजपमधील अंतर्गत गटबाजीमुळे झाल्याचे प्रथम दर्शनी दिसते. भाजप श्रेष्टीनी याची नोंद घेतली असेलच. भाजप आपल्या चुका दुरुस्त करण्यात तत्पर असतो. महाराष्ट्रात सुद्धा २०२३ मध्ये पुण्यातील कसबा या भाजपच्या बालेकिल्ल्यात भाजपचा पराभव झाला होता. मात्र त्यापासून योग्य तो बोध घेऊन चुकांची पुनरावृत्ती टाळण्यात आली आणि २०२४च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ती जागा पुन्हा आपल्याकडे खेचून आणली. अशीच तत्परता बांकीपूर व दतिया या २ मतदार संघात दाखवली जाईल व पुढच्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही जागा भाजप जिंकेल असा विश्वास वाटतो.

पक्षात निर्माण झालेली बेशिस्त, अंतर्गत कलह व गटबाजी ही खरी पराभवापेक्षा भाजपसाठी अधिक धोक्याची घंटा आहे हे मात्र खरे आहे.

–रघुनंदन भागवत

# मैत्री : जीवनाला समृद्ध करणारे अमूल्य नाते

**मनुष्य** हा समाजशील प्राणी आहे, असे आपण नेहमी म्हणतो. समाजात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्रेम, आपुलकी, विश्वास, आधार आणि सहवासाची गरज असते. आई-वडील, भाऊ-बहिण, नातेवाईक ही रक्ताची नाती जन्मतः लाभतात; परंतु एक असे नाते आहे, जे कोणत्याही रक्तसंबंधावर आधारित नसते, कोणत्याही बंधनात अडकलेले नसते आणि तरीही आयुष्यभर माणसाला सुख-दुःखात साथ देत राहते. ते म्हणजे मैत्रीचे नाते. मैत्री ही माणसाच्या जीवनातील सर्वांत सुंदर, निर्मळ आणि निरपेक्ष भावना आहे. आनंदाच्या क्षणी आनंद द्विगुणित करणारी आणि दुःखाच्या क्षणी धीर देणारी शक्ती म्हणजे मैत्री होय. म्हणूनच जगभरात दरवर्षी ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी 'मैत्री दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ शुभेच्छा देण्याचा किंवा मैत्रीचे बँड बांधण्याचा नसून, जीवन समृद्ध करणाऱ्या या अनमोल नात्याचा सन्मान करण्याचा दिवस आहे.

मानवी संस्कृतीच्या विकासाच्या इतिहासात मैत्रीला नेहमीच महत्त्वाचे स्थान राहिले आहे. आदिमानवापासून आधुनिक समाजापर्यंत माणसाने एकत्र राहणे, परस्परांना मदत करणे आणि संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे याच भावनेतून समाजजीवनाचा विकास झाला. या प्रवासात मैत्री ही केवळ दोन व्यक्तींमधील भावना न राहता समाजाच्या ऐक्याचा, सहकार्याचा आणि विश्वासाचा आधार बनली. मैत्री ही स्वार्थावर नव्हे, तर विश्वास, प्रामाणिकपणा, समर्पण आणि परस्पर आदरावर उभी असते. म्हणूनच खरी मैत्री काळाच्या कसोटीवर टिकून राहते.

मैत्री दिनाच्या इतिहासाकडे पाहिले असता, विसाव्या शतकाच्या प्रारंभी या संकल्पनेची सुरुवात झाल्याचे दिसून येते. मित्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एक स्वतंत्र दिवस असावा, अशी कल्पना मांडण्यात आली. पुढे विविध देशांमध्ये ऑगस्ट म हिन्याच्या पहिल्या रविवारी मैत्री दिन साजरा करण्याची परंपरा रूढ झाली. काळाच्या ओघात या दिवसाला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. आज विविध देशांत वेगवेगळ्या तारखांना किंवा पद्धतीने मैत्री दिन साजरा केला जात असला, तरी त्यामागील मूलभूत उद्देश एकच आहेझ्माणसामाणसांतील विश्वास, प्रेम, सहकार्य आणि सौहार्द अधिक दृढ करणे.

आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवनात माणसाकडे सर्व प्रकारची भौतिक साधने आहेत; परंतु मानसिक समाधान, आत्मीयता आणि भावनिक आधार यांची कमतरता अनेकांना जाणवते. अशा वेळी एक सच्चा मित्र माणसासाठी मोठी संपत्ती ठरतो. अनेक वेळा आपण आपल्या मनातील भावना कुटुंबीयांपेक्षाही मित्राशी अधिक मोकळेपणाने व्यक्त करू शकतो. कारण मैत्रीमध्ये कोणतीही औपचारिकता नसते. मित्र आपल्याला जसे आहोत तसे स्वीकारतो. आपल्या यशात मनापासून आनंद व्यक्त करणारा आणि अपयशाच्या वेळी धीर देणारा मित्र जीवनातील सर्वांत मोठा आधार असतो.

खऱ्या मैत्रीची ओळख सुखाच्या काळात होत नाही; ती संकटाच्या वेळी होते. संपत्ती, पद, प्रतिष्ठा किंवा परिस्थिती बदलली तरी जो मित्र आपल्या पाठीशी ठामपणे उभा राहतो, तोच खरा मित्र असतो. जीवनात अनेक परिचित, सहकारी किंवा ओळखीचे लोक भेटतात; परंतु प्रत्येकजण मित्र असतोच असे नाही. मैत्री ही विश्वासाने, सहवासाने आणि परस्पर समजुतीने निर्माण होते. ती एका दिवसात तयार होत नाही, तर काळाच्या ओघात अधिक दृढ होत जाते.

भारतीय संस्कृतीमध्ये मैत्रीला अत्यंत उच्च स्थान देण्यात आले आहे. आपल्या पुराणांमध्ये, महाकाव्यांमध्ये आणि लोकपरंपरेत मैत्रीची अनेक प्रेरणादायी उदाहरणे आढळतात. श्रीकृष्ण आणि सुदामा यांची मैत्री ही त्यातील सर्वांत श्रेष्ठ मानली जाते. गरिबी आणि श्रीमंती यांतील प्रचंड अंतर असूनही त्यांच्या मैत्रीमध्ये कधीही स्वार्थाचा लवलेश नव्हता. श्रीकृष्णाने सुदाम्याच्या प्रेमाचा, निष्ठेचा आणि आत्मीयतेचा केलेला सन्मान आजही मैत्रीचा सर्वोच्च आदर्श मानला जातो. त्याचप्रमाणे श्रीराम आणि सुग्रीव, श्रीराम आणि निषादराज गुह, तसेच भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यातील परस्पर विश्वासाचे नाते भारतीय संस्कृतीतील मैत्रीचे आदर्श उदाहरण म्हणून सांगितले जाते.

भारतीय संतपरंपरेतही मैत्रीला महत्त्वाचे स्थान आहे. संतांनी मानवतेचा संदेश देताना सर्वांशी प्रेम ने, आपुलकीने आणि समतेच्या भावनेने वागण्याचा उपदेश केला. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि इतर संतांच्या विचारांमध्ये माणसामाणसांतील स्नेहभाव, सहकार्य आणि समतेची भावना सातत्याने दिसून येते. खरी मैत्री कोणत्याही जाती, धर्म, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक स्थितीच्या सीमा मानत नाही. ती केवळ माणुसकीला महत्त्व देते.

साहित्य, कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रातही मैत्री हा अनेक लेखक, कवी आणि कलावंतांचा आवडता विषय राहिला आहे. मराठी साहित्यामध्ये अनेक कथा, कादंबऱ्या आणि कवितांमधून मैत्रीचे विविध पैलू उलगडले गेले आहेत. कधी बालमैत्रीचे निरागस रूप, कधी संघर्षातील साथ, कधी त्याग, तर कधी आयुष्यभर टिकणारी आत्मीयता अशा विविध स्वरूपात मैत्रीचे चित्रण साहित्यामध्ये दिसते. कारण प्रत्येकाच्या आयुष्यात मैत्रीचा अनुभव वेगळा असला, तरी तिची भावना सार्वत्रिक आहे.

बालपणातील मैत्री विशेष निरागस असते. शाळेतील बाकावर बसताना, खेळाच्या मैदानात धावताना, अभ्यास करताना किंवा एखादी छोटीशी गोष्ट वाटून घेताना निर्माण होणारे मैत्रीचे नाते अनेकदा संपूर्ण आयुष्यभर टिकून राहते. त्या आठवणी माणसाला आयुष्यभर आनंद देतात. काळ बदलतो, परिस्थिती बदलते, व्यवसाय बदलतात; परंतु बालमैत्रीची ओल मनात कायम राहते. म्हणूनच अनेकजण आयुष्याच्या उत्तरार्धातही आपल्या जुन्या मित्रांचा शोध घेतात आणि त्या नात्याला पुन्हा उजाळा देण्याचा प्रयत्न करतात.

महाविद्यालयीन जीवनात निर्माण होणारी मैत्री व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावते. याच काळात विचारांची देवाणघेवाण, विविध उपक्रमांमध्ये सहभाग, सामाजिक जाण आणि नेतृत्वगुण विकसित होतात. मित्र एकमेकांना प्रेरणा देतात, चुका दाखवून देतात आणि योग्य मार्गावर चालण्याची ताकद देतात. त्यामुळे चांगल्या मित्रांची निवड ही प्रत्येक तरुणासाठी अत्यंत महत्त्वाची असते.

आजच्या वेगवान जीवनात मैत्रीचे महत्त्व पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे. मानसिक तणाव, स्पर्धा, एकाकीपणा आणि वाढत्या अपेक्षांच्या वातावरणात एक विश्वासू मित्र माणसाला नव्याने जगण्याची प्रेरणा देतो. म्हणूनच मैत्री ही केवळ सामाजिक नाती दृढ करणारी भावना नसून मानसिक आरोग्य, भावनिक स्थैर्य आणि आनंदी जीवनाचा भक्कम पाया आहे.

काळ बदलला, तंत्रज्ञान विकसित झाले, जीवनशैलीत आमूलाग्र परिवर्तन झाले; परंतु मैत्रीचे मूल्य आजही तेवढेच कायम आहे. उलट आधुनिक जीवनातील वाढती स्पर्धा, व्यावसायिक धावपळ, ताणतणाव आणि एकाकीपणामुळे मैत्रीची गरज अधिक प्रकर्षाने जाणवू लागली आहे. आज प्रत्येक व्यक्ती यशाच्या शर्यतीत धावत असताना अनेकदा भावनिक आधाराची उणीव जाणवते. अशा वेळी एक सच्चा मित्र जीवनाला नव्याने उभारी देतो. मित्र हा केवळ आनंद साजरा करणारा सहकारी नसतो, तर संकटात धीर देणारा, योग्य सल्ला देणारा आणि चुकीच्या मार्गावर जाण्यापासून परावृत्त करणारा हितचिंतक असतो. म्हणूनच खऱ्या अर्थाने मित्र म्हणजे आपल्या व्यक्तिम त्वाचा आरसा असे म्हटले जाते.

विद्यार्थी जीवनात मैत्रीचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात निर्माण होणारे मैत्रीचे संबंध व्यक्तीच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासात मोलाची भूमिका बजावतात. अभ्यासातील अडचणी दूर करणे, स्पर्धा परीक्षांची तयारी, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, सामाजिक उपक्रम आणि विविध जबाबदाऱ्या पार पाडताना मित्र एकमेकांना प्रोत्साहन देतात. अनेक यशस्वी व्यक्ती आपल्या जीवनप्रवासात मित्रांनी दिलेल्या प्रेरणेचा उल्लेख अभिमानाने करतात. कारण योग्य मित्रांच्या सहवासातून आत्मविश्वास वाढतो, नेतृत्वगुण विकसित होतात आणि सहकार्याची भावना दृढ होते.

तथापि, मैत्रीचे महत्त्व जितके मोठे आहे, तितकीच मित्र निवडताना विवेकाची आवश्यकता आहे. संत तुकाराम महाराजांनी 'संगतीचे फळ' यावर विशेष भर दिला आहे. चांगल्या संगतीमुळे व्यक्तिमत्त्व घडते, तर वाईट संगतीमुळे जीवनाची दिशा बदलू शकते. व्यसनाधीनता, गुन्हेगारी, हिंसक प्रवृत्ती किंवा चुकीच्या सवयींची सुरुवात अनेकदा अयोग्य मि त्रपरिवारातून होत असल्याची उदाहरणे समाजात दिसून येतात. त्यामुळे मैत्री करताना व्यक्तीचे चारित्र्य, मूल्ये, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक दृष्टिकोन यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. खरा मित्र आपल्या चुकीला पाठिंबा देत नाही; उलट ती सुधारण्याचे धैर्य देतो.

आजच्या डिजिटल युगात मैत्रीचे स्वरूपही म ोठ्या प्रमाणात बदलले आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप, एक्स, टेलिग्राम यांसारख्या सामाजिक माध्यमांमुळे जगभरातील लोकांशी काही क्षणांत संपर्क साधणे शक्य झाले आहे. हजारो 'फॉलोअर्स' किंवा 'फ्रेंड्स' असणे ही आज प्रतिष्ठेची बाब मानली जाते. परंतु आभासी जगातील प्रत्येक ओळख ही खरी मैत्री असतेच असे नाही. अनेकदा सोशल मीडियावरील संबंध केवळ औपचारिक किंवा तात्पुरते ठरतात. प्रत्यक्ष भेट, परस्पर विश्वास, संकटातील साथ आणि भावनिक जिव्हाळा यांशिवाय मैत्री पूर्णत्वास जात नाही. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा योग्य उपयोग करताना प्रत्यक्ष मानवी नात्यांचे महत्त्व जपणे ही काळाची गरज आहे.

सामाजिक माध्यमांमुळे संवादाचे नवे मार्ग खुले झाले असले तरी त्यातून काही गंभीर आव्हानेही निर्माण झाली आहेत. तुलना, दिखाऊपणा, अफवा, सायबर फसवणूक, बनावट ओळखी आणि मानसिक ताण यामुळे अनेक तरुण त्रस्त होत आहेत. अशा परिस्थितीत खरी मैत्री ही केवळ ऑनलाइन संदेशांपुरती मर्यादित न राहता विश्वास, संवेदनशीलता आणि प्रत्यक्ष सहवासावर आधारित असावी. मित्राच्या यशाचा हेवा न करता त्यात आनंद मानणे, त्यांच्या अडचणींमध्ये वेळ देणे आणि गरजेच्या वेळी प्रत्यक्ष मदतीसाठी धावून जाणे, हीच मैत्रीची खरी कसोटी आहे.

भारतीय समाज विविधतेने नटलेला आहे. भाषा, धर्म, जात, संस्कृती, प्रांत आणि परंपरा यांमध्ये वैविध्य असूनही मैत्री ही या सर्व सीमांपलीकडे जाणारी भावना आहे. विविध पार्श्वभूमीतील लोकांम ध्ये निर्माण होणारी मैत्री सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुभाव दृढ करण्यास मदत करते. शाळा, महाविद्यालये, कार्यस्थळे, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक चळवळी या सर्व ठिकाणी विविध समाजघटकांतील मैत्रीमुळे परस्पर समज, सहिष्णुता आणि सहकार्याची भावना विकसित होते. त्यामुळे मैत्री ही केवळ वैयक्तिक आनंदाची बाब नसून सामाजिक ऐक्याचीही मजबूत पायाभरणी आहे.

इतिहासातही मैत्रीची अनेक प्रेरणादायी उदाहरणे आढळतात. स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतिकारकांनी एकमेकांवरील विश्वास आणि सहकार्याच्या बळावर संकटांचा सामना केला. सामाजिक सुधारणा चळवळींम ध्येही विचारसरणी, ध्येय आणि समाजसेवेच्या भावनेतून निर्माण झालेल्या मैत्रीने मोठे परिवर्तन घडवून आणले. समान ध्येयासाठी एकत्र येणारे सहकारी पुढे आयुष्यभराचे मित्र बनतात आणि त्यातून समाजहिताचे अनेक उपक्रम साकार होतात.

मैत्रीचे नाते केवळ समान वयाच्या व्यक्तींमध्येच निर्माण होते असे नाही. गुरु-शिष्य, सहकारी, शेजारी, कुटुंबातील सदस्य आणि अगदी दोन पिढ्यांमधील व्यक्तींमध्येही परस्पर आदर, विश्वास आणि आत्मीयतेतून मैत्री फुलू शकते. वय, पद, संपत्ती किंवा सामाजिक स्थान या गोष्टी खऱ्या मैत्रीमध्ये कधीच अडथळा ठरत नाहीत. मनांची जवळीक, विचारांचे साधर्म्य आणि एकमेकांविषयीचा आदर हेच मैत्रीचे खरे अधिष्ठान असते. जागतिकीकरणाच्या युगात विविध देशांतील नागरिकांमध्येही मैत्रीचे बंध अधिक दृढ होत आहेत. विद्यार्थी विनिमय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक देवाणघेवाण, संशोधन, पर्यटन आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध संस्कृतींतील लोक एकमेकांच्या अधिक जवळ येत आहेत. अशा मैत्रीमुळे जागतिक शांतता, सहकार्य आणि परस्पर आदराची भावना वाढीस लागते. त्यामुळे मैत्री हा केवळ वैयक्तिक अनुभव नसून जागतिक बंधुभावाचा प्रभावी संदेशही आहे. जीवनातील अनेक प्रसंग माणसाला मित्रांचे महत्त्व नव्याने जाणवून देतात. आजारपण, आर्थिक अडचण, अपयश, नैराश्य किंवा कौटुंबिक संकट अशा कठीण काळात जे लोक निः स्वार्थपणे साथ देतात, त्यांचे स्थान जीवनात कायमचे अढळ बनते. म्हणूनच संपत्तीपेक्षा चांगले मित्र हीच खरी जीवनातील सर्वांत मोठी कमाई मानली जाते.

पैसा, पद आणि प्रतिष्ठा यांचे महत्त्व काळानुसार बदलते; परंतु सच्च्या मैत्रीची ऊब आयुष्यभर म नाला बळ देत राहते. अशा या मैत्रीच्या नात्याला अधिक संवेदनशील, अधिक विश्वासार्ह आणि अधिक मूल्याधिष्ठित बनविण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. मैत्री ही केवळ आनंदाचा उत्सव नसून जबाबदारी, समर्पण आणि माणुसकीची जपणूक आहे. ही भावना जिवंत राहिली तर समाज अधिक सुसंवादी, सहकार्यशील आणि आनंदी बनेल.

मैत्री दिन हा केवळ शुभेच्छा संदेश पाठविण्याचा, भेटवस्तू देण्याचा किंवा मनगटावर मैत्रीचा बँड बांधण्याचा दिवस नाही. हा दिवस आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान असलेल्या मित्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, जुन्या नात्यांना नव्याने उजाळा देण्याचा आणि नव्या पिढीला मैत्रीतील मूल्यांची जाणीव करून देण्याचा दिवस आहे. आधुनिक जीवनात वेळेअभावी अनेकदा माणूस आपल्या जिवलग मित्रांपासून दूर जातो. व्यावसायिक जबाबदाऱ्या, शिक्षण, नोकरी, स्थलांतर आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे भेटीगाठी कमी होतात; परंतु खऱ्या मैत्रीची ताकद अंतरात नसून मनांच्या जवळकीत असते. अनेक वर्षे भेट न झाल्यानंतरही ज्या नात्यात आत्मीयता कायम राहते, तीच खरी मैत्री होय. आजच्या पिढीसमोर अनेक संधी आहेत, परंतु त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहेत. वाढती स्पर्धा, करिअरची धडपड, मानसिक ताण, नैराश्य, एकाकीपणा आणि डिजिटल जगातील कृत्रिम संबंध यांमुळे तरुणांमध्ये भावनिक अस्थिरता वाढताना दिसते. अशा परिस्थितीत एक समंजस, संवेदनशील आणि विश्वासू मित्र अनेकदा समुपदेशकाची भूमिका बजावतो. मित्राचे एक प्रेमळ शब्द, योग्य वेळी दिलेला धीर किंवा संकटाच्या क्षणी दिलेली साथ एखाद्या व्यक्तीच्या जीवनात मोठा सकारात्मक बदल घडवू शकते. त्यामुळे मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही सुदृढ मैत्री अत्यंत महत्त्वाची ठरते.

मैत्रीचा पाया परस्पर विश्वासावर उभा असतो. विश्वास तुटला की मैत्रीचे अस्तित्व धोक्यात येते. म्हणून मैत्रीमध्ये प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि परस्पर आदर या मूल्यांचे जतन करणे आवश्यक आहे. मित्राच्या यशाचा आनंद साजरा करणे, त्याच्या अपयशात त्याला धीर देणे, चुका दाखवून देताना संवेदनशीलता राखणे आणि गरजेच्या वेळी निः स्वार्थपणे मदतीला धावून जाणे, हीच खरी मैत्रीची ओळख आहे. केवळ आनंदाच्या क्षणी सोबत राहणारा नव्हे, तर संकटात खंबीरपणे उभा राहणारा मित्रच आयुष्यभर स्मरणात राहतो.

कुटुंब आणि समाज यांच्यामध्येही मैत्रीची भावना महत्त्वाची आहे. कुटुंबातील सदस्यांमध्ये जर परस्पर मैत्रीचे नाते निर्माण झाले, तर संवाद अधिक मोकळा होतो, गैरसमज कमी होतात आणि विश्वास वाढतो. पालकांनी मुलांशी केवळ शिस्त लावणाऱ्या व्यक्तीप्रमाणे नव्हे, तर समजून घेणाऱ्या मित्राप्रमाणे संवाद साधला, तर मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी आत्मीयतेने वागल्यास शिक्षण अधिक प्रभावी बनते. त्यामुळे मैत्री ही केवळ समान वयाच्या व्यक्तींमधील भावना नसून समाजातील प्रत्येक नात्याला समृद्ध करणारे मूल्य आहे.

समाजात वाढत चाललेली असहिष्णुता, मतभेद, हिंसा आणि तणाव यांवर मात करण्यासाठीही मैत्रीचा दृष्टिकोन आवश्यक आहे. विविध धर्म, जाती, भाषा, संस्कृती आणि विचारसरणी असलेल्या लोकांनी परस्पर आदर, संवाद आणि सहकार्याची भावना स्वीकारली, तर समाजात शांतता आणि सौहार्द अधिक दृढ होईल. राष्ट्राची एकात्मता आणि लोकशाहीची मजबुती हीदेखील नागरिकांमधील विश्वास, बंधुभाव आणि मैत्रीच्या भावनेवरच अवलंबून असते. म्हणूनच मैत्री हा केवळ वैयक्तिक जीवनाचा विषय नसून सामाजिक परिवर्तनाचा आणि राष्ट्रीय ऐक्याचा आधारस्तंभ आहे.

भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा स्वीकार केला आहे. त्यातील बंधुता ही संकल्पना प्रत्यक्षात मैत्री, परस्पर आदर आणि सहजीवनाच्या भावनेवर आधारित आहे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने वागविणे, मतभेद असूनही माणुसकी जपणे आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हीच बंधुभावाची खरी अभिव्यक्ती आहे. त्यामुळे मैत्रीचे मूल्य हे केवळ वैयक्तिक नात्यांपुरते मर्यादित नसून लोकशाही समाजव्यवस्थेच्या यशासाठीही अत्यावश्यक आहे. पर्यावरण संवर्धन, रक्तदान, वृक्षारोपण, आपत्ती व्यवस्थापन, ग्रामविकास, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक न्याय यांसारख्या अनेक क्षेत्रांत मित्रांच्या समूहाने एकत्र येऊन उल्लेखनीय कार्य केलेली अनेक उदाहरणे आपल्या समाजात पाहायला मिळतात. समान ध्येय, निःस्वार्थ सेवा आणि परस्पर सहकार्य या भावनेतून उभे राहिलेले असे मैत्रीचे बंध समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणतात. त्यामुळे मैत्री ही केवळ दोन व्यक्तींमधील भावनिक नाते नसून समाजहितासाठी कार्य करणारी प्रेरणादायी शक्तीही आहे. आज मैत्री दिन साजरा करताना केवळ औपचारिक शुभेच्छांवर समाधान न मानता आपल्या मित्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची आवश्यकता आहे. अनेकदा आपल्या जीवनात मोठे योगदान देणाऱ्या मित्रांना आपण धन्यवादही म्हणत नाही. या दिवशी जुन्या मित्रांना आठवणे, त्यांची विचारपूस करणे, गैरसमज दूर करणे, तुटलेली नाती पुन्हा जोडणे आणि नव्या पिढीला निःस्वार्थ मैत्रीचे महत्त्व समजावून सांगणे, हीच या दिवसाची खरी सार्थकता ठरेल. संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे, 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले'. ही भावना केवळ दयाभावाची नसून खऱ्या मैत्रीचीही आहे. दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे, त्याच्या अडचणीमध्ये सहभागी होणे आणि अपेक्षारहितपणे मदतीचा हात पुढे करणे, हेच मैत्रीचे खरे तत्त्वज्ञान आहे. स्वार्थ, स्पर्धा आणि दिखाऊपणाच्या युगात ही मूल्ये जपणे हीच काळाची सर्वात मोठी गरज आहे. मैत्री हा जीवनाला मिळालेला अमूल्य आशीर्वाद आहे. पैसा, पद, सत्ता आणि प्रसिद्धी यांचे महत्त्व काळानुसार बदलत जाते; परंतु सच्च्या मित्राचा सहवास आयुष्यभर मनाला आधार देत राहतो. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या जीवनात मैत्रीची बीजे प्रेम, विश्वास, प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि माणुसकीच्या पाण्याने सतत जोपासली पाहिजेत. अशा मैत्रीमुळे व्यक्ती आनंदी होते, कुटुंब सुदृढ होते, समाज सुसंवादी बनतो आणि राष्ट्र अधिक बळकट होते. यंदाचा मैत्री दिन केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर माणुसकी, विश्वास आणि बंधुभाव यांचा नव्याने संकल्प करण्याचा दिवस ठरावा, हीच या दिनानिमित्त सर्वांसाठी मंगल शुभेच्छा.

– डॉ. राजेंद्र बगाटे

# भूतपूर्व सैनिक व भूतपूर्व महिला वन कर्मचाऱ्यांसाठी १३६ इन्फंट्री बटालियन (टीए) इको महारमध्ये भरती मेळावा

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - सशस्त्र दलातील भूतपूर्व सैनिक तसेच वने व हवाम ान बदल मंत्रालय आणि राज्य वन विभागातील भूतपूर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी १३६ इन्फंट्री बटालियन (टेरिटोरियल आर्मी) इको महारमध्ये भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र उमेदवारांनी निर्धारित दिनांक, वेळ व ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

भरती मेळावा दोन टप्प्यांत होणार असून पहिला टप्पा १ ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत १०९ इन्फंट्री बटालियन (टीए) मराठा एलआय, कोल्हापूर येथे, तर दुसरा टप्पा ८ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत एआरओ ग्राउंड, छत्रपती संभाजीनगर येथे दररोज सकाळी ५ वाजल्यापासून होणार आहे.

भरतीसाठी रिक्त पदे जेसीओ - ४ आणि सोल (जीडी) - १६२ पदे केवळ महाराष्ट्रातील उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत. तसेच ट्रेड्समन - १५, सोल क्लार्क (जीडी) - ७, हेअर ड्रेसर - १, मेस कीपर - १, स्टिवर्ड - १, हाऊस कीपर - १, शेफ कम्युनिटी - २ आणि वॉशरमन - २ अशी पदे संपूर्ण भारतातील पात्र उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत.

भरतीसाठी उमेदवार हा सशस्त्र दलातील निवृत्तिवेतनधारक भूतपूर्व सैनिक किंवा वने व हवामान बदल मंत्रालय तसेच राज्य वन विभागात किमान २० वर्षे सेवा केलेला भूतपूर्व महिला कर्मचारी असावा. सेवानिवृत्ती अथवा सेवामुक्तीच्या तारखेपासून भरतीच्या तारखेपर्यंत पाच वर्षांच्या आत नोंदणी झालेली असणे आवश्यक आहे. उमेदवाराची वैद्यकीय श्रेणी 'शेप-१' असावी, चारित्र्य अनुकरणीय अथवा अतिशय चांगले असावे आणि कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी प्रकरणात सहभाग नसावा.

भरतीसाठी उमेदवारांनी मूळ पीपीओ (निवृत्तिवेतन आदेश), मूळ डिस्चार्ज बुक व त्याची स्वयं-साक्षांकित प्रत, अधिवास प्रमाणपत्र, भूतपूर्व सैनिक ओळखपत्र, अलीकडील रंगीत पासपोर्ट आकाराची १० छायाचित्रे तसेच शैक्षणिक प्रमाणपत्रे सोबत आणावीत.

भूतपूर्व सैनिकांसाठी कागदपत्र पडताळणी, एक मैल धाव, पुल-अप्स, बॅलन्स बीम, मुलाखत, वनीकरण व रोपवाटिकेशी संबंधित प्रावीण्य चाचणी आणि वैद्यकीय तपासणी अशी निवड प्रक्रिया राहणार आहे. भूतपूर्व महिला वन कर्मचाऱ्यांसाठी कागदपत्र पडताळणी, मुलाखत, वनीकरण व रोपवाटिकेतील प्रावीण्य चाचणी आणि वैद्यकीय तपासणी होईल.

शारीरिक पात्रतेनुसार भूतपूर्व सैनिकांसाठी किमान उंची १६० सेंमी (गोरखा, गढवाली व आसामी उमेदवारांसाठी १५२ सेंमी), तर भूतपूर्व महिला वन कर्मचाऱ्यांसाठी १५० सेंमी निश्चित करण्यात आली आहे. भूतपूर्व सैनिकांचे किमान वजन ५० किलो, महिला उमेदवारांचे किमान वजन ४२ किलो असावे. छातीचे माप भूतपूर्व सैनिकांसाठी ८२ सेंमी व किमान ५ सेंमी विस्तार, तर महिला उमेदवारांना किमान ५ सेंमी छाती विस्तार करता येणे आवश्यक आहे.

निवड गुणवत्ता व रिक्त पदांच्या आधारे करण्यात येणार असून इको टेरिटोरियल आर्मीम धील सेवा निवृत्तिवेतनास पात्र राहणार नाही. प्रारंभी दोन वर्षांसाठी नियुक्ती देण्यात येईल. कामगिरी समाधानकारक असल्यास एक वर्षाची मुदतवाढ दिली जाऊ शकते. भूतपूर्व सैनिक जेसीओंना ५५ वर्षांपर्यंत, तर भूतपूर्व सैनिक शिपायांना ५० वर्षांपर्यंत सेवा करता येईल. निवड झाल्यानंतर देशात कुठेही सेवा करण्याची तयारी ठेवावी लागेल. भूतपूर्व सैनिकांचे विद्यमान निवृत्तिवेतन मात्र अबाधित राहील.

भरती प्रक्रियेदरम्यान मोबाईल फोनला परवानगी नसून भरती पूर्णपणे विनामूल्य आणि पारदर्शक पद्धतीने होणार आहे. उमेदवारांनी कोणत्याही दलालांच्या किंवा आमिषांच्या भूलथापांना बळी पडू नये. लाच देणे अथवा खोटी कागदपत्रे सादर करणे, माहिती लपविणे किंवा कागदपत्रांमध्ये छेडछाड करणे आढळल्यास उमेदवारी तत्काळ रद्द करण्यात येईल आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. निर्धारित दिनांक, वेळ व ठिकाणी उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांना भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

अधिक माहितीसाठी ९१६८१६८१३६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्रीमंत वाद्य पथकाचे वाद्यपुजन



पुणे दि. ४ ( प्रतिनिधी ) - आषाढी एकादशी झाली आणि आता वेध लागले आहेत ते श्रीगणेशाचे. चौंसष्ट कलांचा अधिपती असलेल्या गणेशाचे स्वागत करण्यास्तव ढोल - ताशे पथक कामाला लागले आहे. त्याचाच एक भाग म्हणून पिंपळे सौदागर येथे नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या श्रीमंत वाद्य पथक ट्रस्टच्या वाद्य पूजन आणि ढोल - ताशे वादन सरावाचा शुभारंभ पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल नाना काटे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार गट ) युवानेते उमेश काटे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे तसेच वाद्यांचे पूजन करुन दिपप्रज्वलन करण्यात आले. श्रीमंत वाद्य पथकाचे अध्यक्ष अभिषेक नागटिळक तसेच वैभव नखाते, मयूर सगलगिले, भैय्या गायकवाड, प्रियांका कुदळे, सुमित डोळस आदिंची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# भारताच्या डिजिटल युगाचा दूरदर्शी शिल्पकार : नंदन निलेकणी

**भारतात** माहिती-तंत्रज्ञानाची क्रांती घडवून आणणाऱ्या आणि देशाला डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्यासाठी भक्कम पाया घालणाऱ्या व्यक्तिमत्वांमध्ये 'नंदन मोहनराव निलेकणी' यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. उद्योगपती, तंत्रज्ञान तज्ज्ञ, धोरण कर्ते, लेखक, समाजसेवक आणि दूरदर्शी विचारवंत अशी त्यांची बहुआयामी ओळख आहे. 'इन्फोसिस' या जागतिक दर्जाच्या भारतीय आयटी कंपनीचे सह संस्थापक म्हणून त्यांनी भारताला जागतिक सॉफ्टवेअर नकाशावर स्थान मिळवून दिले, तर 'भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणा'चे (UIDAI) पहिले अध्यक्ष म्हणून 'आधार' या जगातील सर्वात मोठ्या डिजिटल ओळख प्रणालीची उभारणी करून भारताच्या डिजिटल परिवर्तनाला ऐतिहासिक दिशा दिली. आज आधार, 'युपीआय' (UPI), 'ई-केवायसी' (e-KYC), 'डिजीलॉकर' DigiLocker, 'अकाउंट ॲग्रीगेटर', आणि 'इंडिया स्टॅक' (India Stack) यांसारख्या उपक्रमांमुळे भारत जगभरात 'डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा' (Digital Public Infrastructure) या संकल्पनेचे अग्रगण्य उदाहरण मानला जातो आणि या परिवर्तना मागील प्रमुख विचारवंतांमध्ये नंदन निलेकणी यांचा समावेश होतो.

नंदन निलेकणी यांचा जन्म २ जून १९५५ रोजी 'बंगळुरू' येथे झाला. त्यांचे वडील 'मोहनराव निलेकणी' वस्त्रोद्योग क्षेत्रात कार्यरत होते. त्यामुळे त्यांच्या बालपणात कुटुंबाचे वास्तव्य अनेक शहरांत झाले. विविध संस्कृती आणि जीवनशैली जवळून अनुभवण्याची संधी त्यांना मिळाली. लहानपणापासूनच एखादी समस्या अनेक बाजूंनी पाहून तिचा दीर्घकालीन उपाय शोधण्याची सवय त्यांच्यात होती. पुढे त्यांनी 'भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई' (IIT Bombay) येथून १९७८ मध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली. आयआयटी मध्ये शिक्षण घेताना त्यांनी तांत्रिक ज्ञानाबरोबरच नेतृत्व, विश्लेषणात्मक विचार आणि संघ भावना विकसित केली.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी मुंबईतील 'पाटणी कॉम्प्युटर सिस्टिम्स' मध्ये नोकरी स्वीकारली. ही नोकरी त्यांच्या आयुष्यातील निर्णायक टप्पा ठरली. येथे त्यांची भेट 'एन. आर. नारायण मूर्ती', 'एस. गोपाळकृष्णन', 'एस. डी. शिबुलाल', 'एन. एस. राघवन', 'के. दिनेश' आणि 'अशोक अरोरा' यांच्याशी झाली. त्या काळात भारतातील संगणक उद्योग बाल्यावस्थेत होता. 'सॉफ्टवेअर निर्यात' हा शब्दही फारसा परिचित नव्हता. मात्र या सात तरुण अभियंत्यांनी भारतातून जागतिक दर्जाची सॉफ्टवेअर कंपनी उभारण्याचे धाडसी स्वप्न पाहिले.

१९८१ मध्ये केवळ २५० अमेरिकन डॉलर्सच्या प्रारंभिक भांडवलावर इन्फोसिसची स्थापना झाली. सुरुवातीच्या काळात कंपनीकडे मोठे कार्यालय नव्हते, आधुनिक संगणक नव्हते आणि परदेशी ग्राहकांचा विश्वासही नव्हता. परंतु गुणवत्तापूर्ण सेवा, प्रामाणिक व्यवहार, वेळेचे काटेकोर पालन आणि जागतिक दर्जाच्या व्यवस्थापनाच्या बळावर इन्फोसिसने हळूहळू प्रगती सुरू केली. नंदन निलेकणी यांनी अमेरिकेतील ग्राहकांशी विश्वासाचे संबंध निर्माण केले आणि भारतीय अभियंते जगातील सर्वोत्तम तांत्रिक कौशल्य देऊ शकतात, हे सिद्ध केले.

इन्फोसिसच्या यशा मागील एक महत्त्वाचा घटक म्हणजे 'ग्लोबल डिलिव्हरी मॉडेल'. या संकल्पनेनुसार ग्राहक परदेशात असला तरी प्रकल्पाचा मोठा भाग भारतातून पूर्ण केला जाऊ शकतो. यामुळे खर्च कमी झाला, गुणवत्ता टिकली आणि भारतीय आयटी उद्योगाला अभूतपूर्व चालना मिळाली. आज जगभरात वापरले जाणारे हे मॉडेल त्या काळात अत्यंत क्रांतिकारी मानले जात होते. 'भारतीय अभियंते जागतिक ग्राहकांसाठी दिवस-रात्र काम करू शकतात', ही संकल्पना नंदन निलेकणी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्यक्षात उतरवली. इन्फोसिसने 'कॉर्पोरेट गव्हर्नन्स' मध्येही नवे आदर्श निर्माण केले. कंपनीने आर्थिक पारदर्शकता, गुंतवणूकदारांशी प्रामाणिक संवाद आणि आंतरराष्ट्रीय लेखापरीक्षण मानकांचा स्वीकार केला. कर्मचार्यांचा कंपनीत सहभाग असावा यासाठी शेअर पर्याय (ESOP) प्रभावीपणे राबवून हजारो कर्मचाऱ्यांना संपत्ती निर्माण करण्याची संधी देण्यात आली. भारतातील अनेक आयटी कंपन्यांनी पुढे हीच पद्धत स्वीकारली. त्यामुळे भारतीय मध्यमवर्गातील हजारो अभियंते आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले.

२००२ मध्ये नंदन इन्फोसिसचे 'मुख्य कार्यकारी अधिकारी' झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली कंपनीचा महसूल, ग्राहक वर्ग आणि जागतिक उपस्थिती वेगाने वाढली. अमेरिकेबरोबरच युरोप, आशिया आणि ऑस्ट्रेलियातील मोठ्या कंपन्यांनी इन्फोसिसवरती विश्वास ठेवला. त्यांनी केवळ सॉफ्टवेअर सेवा देण्याऐवजी 'डिजिटल परिवर्तन', 'सल्लागार सेवा', 'व्यवसाय प्रक्रिया सुधारणा' आणि 'नवोन्मेष' यावर भर दिला. परिणामी इन्फोसिस ही जगातील अग्रगण्य आयटी सेवा कंपन्यांपैकी एक बनली. २००९ मध्ये त्यांनी उद्योग विश्वातील अत्यंत यशस्वी कारकीर्द बाजूला ठेवून भारत सरकारचे निमंत्रण स्वीकारले आणि भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाचे पहिले अध्यक्ष बनले. त्या काळात भारतातील लाखो नागरिकांकडे कोणतेही विश्वासार्ह ओळखपत्र नव्हते. सरकारी योजनांमध्ये बनावट लाभार्थी, गळती आणि भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर होत होता. प्रत्येक नागरिकाला एक अद्वितीय डिजिटल ओळख देण्याची कल्पना अत्यंत महत्वाकांक्षी होती. अनेकांनी हा प्रकल्प अशक्य असल्याचे म्हटले; परंतु निलेकणी यांनी तांत्रिक कौशल्य, व्यवस्थापन आणि मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्याची क्षमता यामुळे हा प्रकल्प वास्तवात आणला. आधार हा जगातील सर्वात मोठा बायोमेट्रिक ओळख प्रकल्प ठरला. अब्जावधी बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बुबुळांची माहिती आणि नागरिकांची मूलभूत माहिती सुरक्षित डिजिटल पद्धतीने नोंदविणे हे अभूतपूर्व आव्हान होते. अत्यल्प खर्चात, मोठ्या लोकसंख्येसाठी आणि देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचणारी अशी प्रणाली उभारणे हे जगातील अनेक देशांसाठी अभ्यासाचे उदाहरण ठरले. आज शासकीय अनुदाने, बँक खाते उघडणे, मोबाईल सिम, ई-केवायसी आणि इतर अनेक सेवांमध्ये आधारचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. निलेकणी यांनी नेहमीच 'आधार हा केवळ ओळखपत्र नसून डिजिटल अर्थव्यवस्थेचा पाया' असल्याचे सांगितले आहे. आधारच्या माध्यमातून नागरिकांची ओळख डिजिटल पद्धतीने पडताळण्याची सुविधा उपलब्ध झाली. याच पायावर पुढे अनेक सरकारी तसेच खाजगी डिजिटल प्रणाली विकसित झाल्या. या प्रणालींमुळे नागरिक, उद्योग आणि सरकार यांच्यातील व्यवहार अधिक वेगवान, पारदर्शक आणि किफायतशीर झाले. अर्थात, आधार प्रकल्पावर गोपनीयता, डेटा संरक्षण आणि वैयक्तिक माहितीच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रश्नही उपस्थित झाले. या मुद्द्यांवर सार्वजनिक चर्चा, न्यायालयीन सुनावण्या आणि धोरणात्मक बदल झाले. निलेकणी यांनी वारंवार असे स्पष्ट केले की, डिजिटल प्रणालींमध्ये मजबूत कायदेशीर चौकट, सुरक्षित तांत्रिक रचना आणि नागरिकांच्या गोपनीयतेचे संरक्षण या गोष्टी अत्यावश्यक आहेत. भारतात डिजिटल हक्क आणि गोपनीयतेवरील चर्चेला आधार प्रकल्पामुळे मोठी चालना मिळाली.

२०१४ मध्ये त्यांनी बंगळुरू दक्षिण लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. निवडणुकीत त्यांना यश मिळाले नाही, परंतु सार्वजनिक जीवनात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परिवर्तन घडवण्याची त्यांची भूमिका कायम राहिली. निवडणुकीनंतर त्यांनी पुन्हा उद्योग, सार्वजनिक धोरण आणि सामाजिक उपक्रमांवर लक्ष केंद्रित केले. २०१७ मध्ये इन्फोसिस मध्ये व्यवस्थापनाशी संबंधित आव्हाने निर्माण झाल्यानंतर निलेकणी यांना पुन्हा कंपनीच्या अध्यक्षपदी (छेप-एुशर्लीीर्ळींश उहरळीरप) बोलावण्यात आले. त्यांनी संस्थापक, संचालक मंडळ आणि गुंतवणूकदार यांच्यात विश्वासाचे वातावरण निर्माण केले. त्यांच्या नेतृत्वाखाली इन्फोसिसने 'क्लाउड कॉम्प्युटिंग', 'कृत्रिम बुद्धिमत्ता', 'डेटा ॲनालिटिक्स', 'सायबर सुरक्षा' आणि 'डिजिटल परिवर्तन' या क्षेत्रांमध्ये मोठी गुंतवणूक केली. आज इन्फोसिस जगभरातील हजारो कंपन्यांना डिजिटल सेवा पुरविणाऱ्या अग्रगण्य कंपन्यांपैकी एक आहे. नंदन निलेकणी हे केवळ उद्योगपती नाहीत, तर विचारवंत लेखकही आहेत. 'ईमॅजिनिंग इंडिया' 'रीबुटिंग इंडिया' आणि 'द आर्ट ऑफ बिटफुलनेस' या पुस्तकांमधून त्यांनी भारताची लोकसंख्या, डिजिटल शासन, शिक्षण, नवोपक्रम, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भविष्यातील अर्थव्यवस्था याबाबत दूरदर्शी विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे तरुण लोकसंख्या, डिजिटल तंत्रज्ञान आणि खुली नवोपक्रम संस्कृती. त्यांच्या पत्नी 'रोहिणी निलेकणी' या प्रसिद्ध समाज सेविका आणि लेखिका आहेत. या दांपत्याने शिक्षण, पर्यावरण, जल संधारण, सार्वजनिक आरोग्य, नागरी समाज संस्था आणि सामाजिक नवोपक्रम यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत केली आहे. त्यांनी 'एकस्टेप फाउंडेशन' या संस्थेची सह-स्थापना केली. ही संस्था मुलांच्या मूलभूत साक्षरता आणि अंक ज्ञानासाठी मुक्त डिजिटल शैक्षणिक साधने विकसित करते. नंदन निलेकणी यांना 'पद्मभूषण' (२००६), 'फॉर्च्युन आशिया बिझनेस मन ऑफ द इयर', 'फोर्ब्स आशिया बिझनेस मन ऑफ द इयर', 'टाइम' मासिकाच्या जगातील सर्वाधिक प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत दोनदा स्थान, 'इकॉनॉमिस्ट सोशल अँड इकॉनॉमिक इनोव्हेशन अवॉर्ड', 'निक्केई आशिया प्राइज', 'ईवाय लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्ड' अशा अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. २०२४ मध्ये 'टाइम' मासिकाने त्यांचा कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रभावी व्यक्तींमध्येही समावेश केला. जुलै २०२६ पर्यंत, नंदन निलेकणी यांची अंदाजित एकूण संपत्ती सुमारे २.४ अब्ज अमेरिकन डॉलर्स (विनिमय दरानुसार साधारणपणे २०,००० ते २०,५०० कोटी रुपये) इतकी आहे. त्यांची संपत्ती इन्फोसिसच्या शेअर्सच्या बाजारभावानुसार कमी-जास्त होत असते, कारण त्यांच्या एकूण संपत्तीचा मोठा हिस्सा कंपनीतील त्यांच्या मालकीच्या हिस्स्यातून आलेला आहे.

नंदन निलेकणी आणि त्यांच्या पत्नी रोहिणी निलेकणी हे भारतातील प्रमुख दानशूर व्यक्तींपैकी एक आहेत. त्यांनी शिक्षण, सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा, संशोधन आणि सामाजिक विकास या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर देणग्या दिल्या आहेत. त्यांच्या उल्लेखनीय योगदाना पैकी एक म्हणजे संशोधन आणि पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी आयआयटी (IIT) मुंबईला दिलेली ३८ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची देणगी (साधारणपणे ३५० कोटी रुपये). भारताची 'डिजिटल ओळख', 'डिजिटल पेमेंट्स' आणि 'डेटा एक्सचेंज' या तीन स्तंभांवर आधारित 'जगातील सर्वात मोठी डिजिटल अर्थव्यवस्था' निर्माण करण्याची क्षमता असल्याचा त्यांचा विश्वास आहे. २०२६ मध्ये भारताच्या सार्वजनिक परीक्षा व्यवस्थेत तंत्रज्ञानाधारित सुधारणा घडवून आणण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय राष्ट्रीय कार्यबलाचे नेतृत्व करण्याची जबाबदारीही त्यांच्याकडे सोपवण्यात आली, ज्यातून सार्वजनिक व्यवस्थापनातील त्यांच्या कौशल्यावर असलेला विश्वास पुन्हा अधोरेखित झाला आहे. नंदन निलेकणी यांच्या यशामागे काही मूलभूत तत्त्वे दिसून येतातङ्कमोठे स्वप्न पाहण्याची हिंमत, तंत्रज्ञानाचा समाज हितासाठी वापर, पारदर्शकता, गुणवत्तेशी तडजोड न करणे आणि दीर्घकालीन विचार. त्यांच्या जीवन प्रवासातून हे स्पष्ट होते की तंत्रज्ञानाची खरी शक्ती केवळ उद्योगांना नफा मिळवून देण्यात नसून सामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुलभ, पारदर्शक आणि सन्मानजनक बनवण्यात आहे. म्हणूनच नंदन निलेकणी हे केवळ यशस्वी उद्योगपती नाहीत; ते आधुनिक भारताच्या डिजिटल पुनर्जागरणाचे प्रमुख शिल्पकार म्हणून इतिहासात कायम आदराचे स्थान मिळवून राहतील.

**- प्रा. हेमंत सुधाकर सामंत**

# जितो लेडीज विंगतर्फे उडान लाइफस्टाईल प्रदर्शन आयोजन




छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - जितो लेडीज विंग, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने उडान - लाइफस्टाईल एक्झिबिशन या राखी व तीज स्पेशल एडिशन ४ चे भव्य आयोजन दि. ५ व ६ ऑगस्ट २०२६ रोजी हॉटेल अतिथी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे.

या दोन दिवसीय महोत्सवाचे उद्घाटन दि. ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर महिला पदाधिकारी व सौ. डिम्पल पगारिया (महाराष्ट्र राज्य कन्व्हेनर) यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

जितो लेडीज विंगच्या अध्यक्षा प्रिया मुथा यांनी माहिती देताना सांगितले की, उडानचे हे चौथे पर्व असून यंदा कोलकाता, दिल्ली, मुंबई, इंदूर, रायपूर यांसह देशातील विविध शहरांतून ७५ हून अधिक नामांकित प्रदर्शक सहभागी होत आहेत. तसेच महिला सक्षमीकरण हा सामाजिक उद्देश डोळ्यासमोर ठेवून जितो लेडीजने साधार्मिक महिलांसाठी स्टॉल्स प्रायोजित केले आहेत. त्यामुळे नागरिकांना एकाच छताखाली उत्कृष्ट दर्जाच्या विविध वस्तूंची खरेदी करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

या प्रदर्शनामध्ये फॅशन ज्वेलरी, डिझायनर साड्या, एथनिक व वेस्टर्न परिधान, किड्स वेअर, पर्सेस, गिफ्ट हॅम्पर्स, होम डेकोर, गृहउपयोगी वस्तू, ब्युटी प्रॉडक्ट्स, लाइफस्टाईल प्रॉडक्ट्स, राखी व तीज स्पेशल कलेक्शन तसेच विविध गृहउद्योगांच्या आकर्षक वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असतील.

रक्षाबंधन व तीज या सणांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या भव्य प्रदर्शनाचा लाभ घेण्यासाठी शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमाचे इव्हेंट हेड म्हणून डॉ. प्रियांका संघवी व सारिका सेठी कार्यरत असून त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण आयोजनाची जबाबदारी पार पाडली जात आहे.

या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी सोनल जैन, डॉ. प्रियांका संघवी, प्रीती बाकलीवाल, रुतु जैन, सपना मुथियान, सारिका सेठी, प्रभा पगारिया, रश्मी जैन, अनुजा जैन, नीता सेठिया, सुरुची मुगदिया, रश्मी झाबड व स्मृती सिंधी यांच्यासह जितो लेडीज विंगच्या सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच जितो चॅप्टरचे अध्यक्ष अनिल संचेती, आशीष सकलेचा आणि रवींद्र खिवसरा हे विशेष परिश्रम घेत आहेत. तसेच जितोच्या विविध चॅप्टर्सचे पदाधिकारी, प्रायोजक, सहकार्य करणारे उद्योजक आणि स्वयंसेवक यांच्या सहकार्यामुळे हा महोत्सव अधिक भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे.

राखी आणि तीज या सणांच्या उत्साहात खरेदी, फॅशन आणि आनंदाचा अनोखा संगम अनुभवण्यासाठी उडान - लाइफस्टाईल एक्झिबिशनला अवश्य भेट द्यावी, असे आवाहन जितो लेडीज विंग, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ट्रेलरनंतर देशभर घुमणार 'मिर्झापूर: द मूव्ही'चा जलवा; ७-८ शहरांमध्ये होणार मेगा प्रमोशन

**अनेक** महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर 'मिर्झापूर: द मूव्ही'च्या निर्मात्यांनी नुकताच चित्रपटाचा दमदार टीझर प्रदर्शित केला, ज्यातून चाहत्यांना या आयकॉनिक फ्रँचायझीच्या मोठ्या पडद्यावरील रूपांतराची पहिली झलक पाहायला मिळाली. पंकज त्रिपाठी, अली फझल आणि दिव्येंदू शर्मा पुन्हा एकदा आपल्या चाहत्यांच्या लाडक्या भूमिकांमध्ये दिसत आहेत. या टीझरने प्रेक्षकांना एका भव्य सिनेमॅटिक अनुभवाचे आश्वासन दिले आहे, ज्यामध्ये तोच ॲक्शन, इंटेन्स ड्रामा आणि दमदार कथानक पाहायला मिळणार आहे, ज्यामुळे 'मिर्झापूर'ला एक वेगळी ओळख मिळाली.




चित्रपटाशी संबंधित एका जवळच्या सूत्रानुसार, ११ ऑगस्टला ट्रेलर रिलीज झाल्यानंतर 'मिर्झापूर: द मूव्ही'ची टीम मोठ्या प्रमाणावर प्रमोशनला सुरुवात करणार आहे. निर्माते ७ ते ८ शहरांमध्ये विशेष मल्टी-सिटी ट्रेलर लॉन्च रोड ट्रिपची तयारी करत आहेत. या दौऱ्यात चित्रपटातील प्रमुख कलाकार देशभरातील विविध शहरांना भेट देऊन चाहत्यांशी संवाद साधतील आणि थिएटर रिलीजपूर्वी 'मिर्झापूर: द मूव्ही'चा भौकाल थेट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतील. या दमदार स्टारकास्टमध्ये अभिषेक बॅनर्जी, रसिका दुगल, मोहित मलिक, शीबा चड्ढा, राजेश तैलंग, प्रमोद पाठक, श्रिया पिळगावकर, हर्षिता शेखर गौर, श्वेता त्रिपाठी आणि सोनल एस. चौहान यांचाही समावेश आहे. हे सर्व कलाकार मिर्झापूरच्या विश्वातील एक नवे आणि रोमांचक पर्व मोठ्या पडद्यावर साकारताना दिसणार आहेत.

'मिर्झापूर: द मूव्ही'ची प्रस्तुती Amazon MGM Studios आणि Excel Entertainment करत आहेत. गुरमीत सिंग यांच्या दिग्दर्शनाखाली आणि पुनीत कृष्णा यांच्या लेखणीतून साकारलेल्या या चित्रपटाची निर्मिती एक्सेल एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी केली असून, कासिम जगमागिया आणि विशाल राम चंद्रानी हे सहनिर्माते आहेत. हा चित्रपट ४ सप्टेंबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा भौकाल आणखी मोठ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'मिर्झापूर: द मूव्ही' हिंदी आणि तेलुगू या दोन भाषांमध्ये प्रदर्शित केली जाणार आहे.

# मुकुंद चिलवंत यांनी स्वीकारला अहिल्यानगर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार



अहिल्यानगर, दि. ४ (प्रतिनिधी) - राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयाच्या जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार मुकुंद चिलवंत यांनी आज स्वीकारला. यानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात साध्या पण उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.

मुकुंद चिलवंत यांना माहिती व जनसंपर्क विभागातील विविध स्तरांवर काम करण्याचा समृद्ध अनुभव आहे. मंत्रालय, मुंबई येथील वृत्तचित्र शाखेत कार्यरत असताना त्यांनी शासनाच्या विविध विकासात्मक उपक्रमांचे प्रभावी दृकश्राव्य दस्तावेजीकरण, जनजागृतीपर माहितीपट निर्मिती तसेच जनसंपर्कविषयक विविध उपक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. अहिल्यानगर येथे पदभार स्वीकारण्यापूर्वी ते सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या प्रशासकीय अनुभवामुळे तसेच प्रभावी संवादकौशल्यामुळे शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यभार स्वीकारल्यानंतर श्री. चिलवंत यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत अधिक वेगाने, अचूकपणे व परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच प्रसारमाध्यमांशी सुसंवाद राखत माहिती विभागाची विश्वासार्हता अधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी मावळते माहिती अधिकारी अमोल महाजन यांनी श्री. चिलवंत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही त्यांचे स्वागत करून नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

या प्रसंगी लिपिक आयुष बाळदे, तुषार पाटील वाहन चालक प्रवीण मुठे आदी उपस्थित होते.

# पिं. चिं. मराठी पत्रकार संघातर्फे शालेय विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप

पुणे दि. ४ (प्रतिनिधी) - अ. भा. मराठी पत्रकार परिषद अंतर्गत पिंपरी चिंचवड मराठी पत्रकार संघ आणि पिंपरी चिंचवड डिजिटल मिडिया परिषदेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेच्या थेरगाव येथील पीएम श्री माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप करण्यात आले.

मंगळवार दि. ४ रोजी सकाळी शाळेच्या परिसरात झालेल्या या कार्यक्रमात अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे, पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष सागर सुर्यवंशी, डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष विनय सोनवणे, तसेच पत्रकार सिध्दांत चौधरी, महावीर जाधव, नरेश जीनवाल,



विजय न्यायाधीश, प्रशालेचे मुख्याध्यापक बी. ए. राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी गणेश मोकाशी आणि विनय सोनवणे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यकर्तुत्वाचा आढावा घेणारे मार्गदर्शनपर विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेचे शिक्षकवृंद नामदेव कोकणे, हर्षदा राऊत, इस्माईल मुल्ला, अकिब जावेद, मंगला आव्हाड, प्रतिभा शिंदे, सारिका कोळी, नेहा जाधव आदिंनी परिश्रम घेतले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# नर्सेस फेडरेशनचे २ तास 'काम बंद' आंदोलन; मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संपाचा इशारा

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनने विविध प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारी (४ ऑगस्ट) राज्यभरात दोन तासांचे 'काम बंद' आंदोलन केले. सकाळी ७:३० ते ९:३० या वेळेत परिचारिकांनी सेवा थांबवून जोरदार घोषणाबाजी व निदर्शने केली. छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयातील शासकीय परिचारिका संघटनेच्या सदस्यांनीही यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

राज्यभरातील परिचारिकांच्या रिक्त पदांची भरती करण्याची मागणी सातत्याने केली जात होती, मात्र राज्य सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे संतप्त झालेल्या परिचारिकांनी हे आंदोलन केले. महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनच्या अध्यक्षा इंदुमती थोरात यांनी इशारा दिला आहे की, जर सरकारने सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर बेमुदत संपावर जावे लागेल.

शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रलंबित प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने परिचारिका संवर्गात तीव्र असंतोष आहे. परिचारिका, परिसेविका, विभागीय परिसेविका, पाठ्यनिर्देशिका, सहाय्यक आधिसेविका आणि आधिसेविका अशा विविध पदांवर हजारो जागा रिक्त आहेत. वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर ही पदे भरणे अत्यंत आवश्यक असतानाही शासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनेने केला. 'हे आंदोलन आम्ही स्वतःहून करत नसून, शासनाच्या उदासीन धोरणामुळे ते आमच्यावर लादले गेले आहे,' असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. आंदोलकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सुधारित सेवा प्रवेश नियम तात्काळ अंतिम करणे, नवीन आकृतीबंध तयार करून त्यास त्वरित शासन मान्यता देणे, रखडलेली सर्व पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करणे आणि सर्व रिक्त पदांवर सरळ सेवेद्वारे तात्काळ भरती प्रक्रिया सुरू करणे यांचा समावेश आहे. या निदर्शनांमध्ये फेडरेशनच्या राज्याध्यक्ष इंदुमती थोरात यांच्यासह



शुभमंगल भक्त, मकरंद उदयकार, प्रवीण व्यवहारे, वंदना कोळनूरकर, प्रतिभा अंधारे, कालिंदी इधाटे, लता सोंडगे, अनुजा टेकाळे, मुजम्मिल पठाण, गणेश गावडे, दादासाहेब कासार, मिलिंद तोगारवाड यांच्यासह हजारो परिचारिका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनच्या राज्याध्यक्ष इंदुमती थोरात म्हणाल्या, 'शासनाने आमच्या या आंदोलनाची त्वरित दखल घेऊन मागण्या पूर्ण कराव्यात. अन्यथा, यानंतर राज्यभरात बेमुदत काम बंद आंदोलन छेडण्यात येईल.'

# जायकवाडी धरणातून १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग; गोदावरीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा



छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील जायकवाडी धरणातून (नाथसागर जलाशय) आज, मंगळवार (४ ऑगस्ट) सायंकाळी गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात येणार असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जायकवाडी धरण नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ५ ते ६ वाजेदरम्यान धरणाच्या सांडव्याद्वारे १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार आहे.

धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या पाण्याच्या आवकेनुसार या विसर्गात आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट केली जाऊ शकते, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विसर्ग सुरू होणार असल्याने गोदावरी नदीपात्रात कोणीही प्रवेश करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, जेणेकरून कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी होणार नाही. जायकवाडी पाटबंधारे विभागाने गोदावरी नदीकाठच्या सर्व गावांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रशासनाकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात असून, पाण्याच्या आवकेनुसार विसर्गात बदल होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा स्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- अंमली पदार्थांचे सेवन, तस्करी व बेकायदेशीर व्यापार रोखण्यासाठी तसेच विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधण्यासाठी जिल्हा स्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती ची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे उपअधीक्षक सचिन गाढवे, अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क, शिक्षण, न्यायवैद्यक प्रयोगशाळा, एमआयडीसी, पोलीस विभाग तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या शासन परिपत्रकानुसार तसेच दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार जिल्हा व तालुका स्तरावर अंमली पदार्थाविरोधात प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. बैठकीत जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या प्रतिबंधासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. अंमली पदार्थांविरोधात सातत्याने कारवाई करून उत्पादन, वाहतूक, विक्री व सेवन यांना आळा घालण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी जिल्ह्यातील सुमारे ८०० शाळांमध्ये अंमली पदार्थांविरोधात जनजागृती अभियान राबविणे, नशामुक्त पंधरवाडा साजरा करणे, पथनाट्याच्या माध्यमातून वर्षभर जनजागृतीचे कॅलेंडर राबविणे, शाळा, महाविद्यालये व शासकीय कार्यालयांमध्ये अंमली पदार्थविरोधी शपथ घेणे, तसेच पोलीस पाटील मेळाव्यांद्वारे गावपातळीवर जनजागृती करण्याबाबत माहिती देण्यात आली.

शाळा व महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात अंमली पदार्थांवरील प्रतिबंधाची प्रभावी अंमलबजावणी, ई-सिगारेटचा वापर व विक्री प्रतिबंधित असल्याची जनजागृती, तसेच नागरिकांनी संशयास्पद हालचालींची माहिती नार्कोटिक्स हेल्पलाईन क्रमांक ९१७५७७७६४६ वर देण्याचे आवाहन करण्यात आले. यासाठी जनजागृतीपर स्टिकर्सही लावण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

# स्तनपानाबाबत जनजागृतीसाठी मनपाची पुढाकार; नर्सिंग स्टाफला विशेष प्रशिक्षण





छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- दरवर्षी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो. यावर्षीच्या स्तनपान सप्ताहाचे, 'शाश्वत जीवनाच्या सुरुवातीसाठी स्तनपान : जे प्रभावी आहे ते अधिक बळकट करा' (Breastfeeding for a Sustainable Start in Life: Strengthen What Works) हे ब्रीदवाक्य आहे. या अनुषंगाने वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्ज्वला भामरे यांच्या संकल्पनेतून आज दि. ०४ ऑगस्ट २०२६ रोजी मनपा आरोग्य केंद्रांतील सर्व नर्सिंग स्टाफसाठी स्तनपान विषयक कार्यशाळेचे आयोजन घ्र्ँ हॉल येथे दुपारी ३ ते ५ या वेळेत करण्यात आले. या कार्यशाळेत १५१ जणांची उपस्थिती होती.

कार्यशाळेचा विषय 'For Successful Breastfeeding- Catch Them Early' हा होता. स्तनपान हे जन्मानंतर एका तासाच्या आत बाळाला सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे, ज्याचे प्रमाण केवळ ४१टक्के आहे. यासाठी मातेला गरोदर असतानाच स्तनपानाविषयी संपूर्ण माहिती मिळणे आवश्यक, तिची मनाची तयारी होणे आवश्यक 'Catch Them Early – Catch the Mother During Pregnancy for Early Initiation and Successful Breastfeeding'

या कार्यशाळेत डॉ. रोशनी सोधी, बाल रोगतज्ज्ञ तथा स्तनपान समुपदेशक यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ANC क्लिनिकमध्ये गरोदर मातांना स्तनपान कसे करावे, जन्मानंतर बाळाला स्तनाला योग्य प्रकारे कसे लावावे, आईचा आहार कसा असावा, तसेच प्रभावी समुपदेशन कसे करावे याबाबत सविस्तर माहिती त्यांनी दिली. इझऊ व व्हिडिओच्या माध्यमातून संवादात्मक पद्धतीने विषय समजावून सांगत उपस्थित नर्सिंग स्टाफच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

तसेच जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये गरोदर माता व स्तनदा मातांना स्तनपानाविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हा उपक्रम केवळ स्तनपान सप्ताहापुरता मर्यादित न राहता, भविष्यातही नियमित व सातत्याने राबविण्यात येणार असून स्तनपानाबाबत जनजागृती आणि समुपदेशनाची ही सेवा निरंतर सुरू ठेवण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मेघा जोगदंड, बन्सीलालनगर रुग्णालय स्टाफ तसेच मुख्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता.

अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
>
> **-रामेश्वर नाईक**
> कक्ष प्रमुख
> मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

# जिल्हा माहिती कार्यालयाच्या माहिती अधिकारीपदी संजीवनी जाधव-पाटील रुजू

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय बदलीने नियुक्त झालेल्या संजीवनी जाधव पाटील यांनी आज माहिती अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.

श्रीमती जाधव-पाटील या सन २०१३ मध्ये राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिपत्याखालील उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे उपसंपादक म्हणून रुजू झाल्या. त्यानंतर त्यांनी विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. पुढे कोकण विभागीय माहिती कार्यालय, नवी मुंबई येथे सहायक संचालक म्हणून त्यांनी प्रभावीपणे कार्य केले. प्रशासकीय बदलीनंतर त्यांची जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी आज पदभार स्वीकारला.

यावेळी विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगरचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी श्रीमती जाधव-पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. शासनाच्या जनकल्याणकारी योजना, विकासकामे आणि विविध लोकाभिमुख उपक्रमांची माहिती प्रभावीपणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समन्वयाने कार्य करावे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कला शाखेतील पदवीधर असलेल्या श्रीमती जाधव-पाटील यांनी पत्रकारिता विषयात बी.जे., एम.जे. तसेच एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. त्यांना पत्रकारिता क्षेत्राचा दांडगा अनुभव असून शासन सेवेत रुजू होण्यापूर्वी त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील दै. लोकपत्रमध्ये उपसंपादक म्हणून कार्य केले आहे. तसेच आकाशवाणी केंद्रात प्रादेशिक वृत्तनिवेदिका आणि एमसीएन (माध्यम) वृत्तवाहिनीमध्ये निवेदिका म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. पत्रकारिता व जनसंपर्क क्षेत्रातील अनुभवाच्या बळावर शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी त्या प्रयत्नशील राहणार आहेत.

## (पान १ वरुन)

### राम मंदिरातील दानपेटी रक्कम चोरीच्या...

आणि इतर केंद्रीय तपास यंत्रणा कुठे आहेत? तसेच, सरकारने यावर सभागृहात उत्तर दिले पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला.

याला उत्तर देताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने काळ्या पट्ट्या बांधून राम मंदिराच्या बांधकामाला विरोध केला होता. ते म्हणाले की, जे लोक पूर्वी विरोधात होते, तेच लोक आज मगरीचे अश्रू ढाळून देशाला दिशाभूल करू शकत नाहीत. त्यांनी मागणी केली की, सरकारकडे उत्तरे मागण्यापूर्वी त्यांनी प्रभू रामाचा अपमान केल्याबद्दल आधी देशाची माफी मागावी.

### राज्यात पावसाचा जोर ओसरला;...

मध्यम पाऊस पडेल.

गेल्या आठवड्यात पावसाचा हाहाकार अनुभवणाऱ्या कोकणाला आता मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी सध्या कोणताही हवामान इशारा नाही. इथे केवळ हलक्या सरी आणि ढगाळ वातावरण राहील. तसेच, उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार आणि जळगाव येथेही कोरडे हवामान किंवा पावसाची हलकी उघडीप राहण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यात पावसाची तूट अद्यापही भरून निघालेली नाही. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये कोणताही अलर्ट देण्यात आलेला नाही. येथे पुढील काही दिवस पावसाचा जोर कमीच राहणार असून, हलका पाऊस आणि ढगाळ हवामान राहील. पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे मराठवाड्यासह राज्यातील इतर काही भागांतील शेतकऱ्यांची चिंता आता वाढू लागली आहे.

### राजीनामा देण्याचा प्रयत्न केला तर क्षणात...

संयम बाळगला नाही का?"

यानंतर डीके शिवकुमार यांनी उच्च पदावर पोहोचलेल्या काँग्रेसच्या माजी नेत्यांचे उदाहरण दिले, ज्यांना सुरुवातीच्या काळात अपयशाचा सामना करावा लागला होता. राजकीय कारकिर्दीसाठी संयम आवश्यक असतो, असे ते म्हणाले.

डीके शिवकुमार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सुमारे दोन महिन्यांनी कर्नाटक मंत्रिमंडळात २० आमदारांना मंत्री पद दिले गेले. मंत्रिमंडळाचा शपथविधी झाल्यानंतर त्यांची ही टिप्पणी आली. विस्तारानंतर मंत्रीपदे न मिळाल्याने काँग्रेसच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी लगेचच निराशा व्यक्त केली. राज्य मंडळे आणि महामंडळांमधील नियुक्त्यांची पुनर्रचना पूर्ण झाल्यावर आपण नाराज आमदारांशी वैयक्तिकरित्या बोलू, असे डी. के. शिवकुमार म्हणाले आहेत.

### सुनेत्रा पवारांना 'गुंगी गुडिया' म्हणणाऱ्या...

उत्तर दिली होती. मात्र, काँग्रेसने संभ्रम निर्माण केला आहे, त्यामुळे यांचं हास्य झाले, अशा शब्दात राष्ट्रवादीचे सूरज चव्हाण यांनी पलटवार केला.

काँग्रेस पक्षाने सुनेत्रा पवारांचा उल्लेख गुंगी गुडिया असा करणे ही काँग्रेसची बौद्धिक दिवाळखोरी आहे. अजित दादांच्या पावलावर पाऊल ठेवत सुनेत्रा पवारांनी सकाळी ७ वाजता कामाला सुरुवात केली ते रात्री १० वाजेपर्यंत त्या लोकांचे प्रश्न सोडवत होत्या, त्यांच्या ह्या कामाने त्यांचे नेतृत्व सिध्द करून दाखवले आहे. सुनेत्रा पवारांच्या केलेल्या अपमानाबद्दल काँग्रेसने तत्काळ माफी मागावी अन्यथा त्यांच्याच भाषेत त्यांना उत्तर देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सक्षम आहे, असा शब्दातही राष्ट्रवादीच्या महिला नेत्यांनी पलटवार केला आहे.

### अमेरिकेची जवळपास सगळी मिसाइल्स संपली

इस्त्रायलच्या साथीने इराणविरोधात लष्करी मोहीम सुरू केली होती. हे युद्ध अल्पावधीत संपेल असा दोन्ही देशांचा अंदाज होता; परंतु संघर्ष लांबल्यामुळे अमेरिकेची संसाधने वेगाने संपली. अचूक क्षेपणास्त्रांची कमतरता निर्माण झाल्यामुळे, ट्रम्प प्रशासनाने इराणवर पुन्हा मोठे हल्ले करण्याचे ठरवल्यास त्यांना फायटर जेट्स आणि बॉम्बर्स विमानांसारख्या अधिक जोखमीच्या पर्यायांवर अवलंबून राहावे लागेल. यामुळे अमेरिकन वैमानिकांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता वाढली आहे. याशिवाय क्षेपणास्त्रांच्या कमतरतेमुळे चीन आणि रशियासारख्या जागतिक प्रतिस्पर्ध्यांना रोखण्याच्या अमेरिकेच्या लष्करी क्षमतेवरही विपरीत परिणाम होण्याची भीती संरक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

### ट्विटरवरुन पोस्ट हटवा, माफी मागा;...

दिला आहे. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्याविरोधात काँग्रेसच्या अधिकृत एक्स खात्यावरून करण्यात आलेली पोस्ट ही त्यांच्या वैचारिक दिवाळखोरीचे जाहीर प्रदर्शन आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात मतभेद असू शकतात, राजकीय संघर्षही असू शकतो. परंतु महिलांचा अवमान करणारी, वैयक्तिक पातळीवर घसरलेली भाषा कधीही स्वीकारली जाऊ शकत नाही, असे सुनील तटकरे यांनी म्हटलंय.

**महाराष्ट्र शासन**
**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर,**
**जलसंपदा विभाग**
**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**
**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १. छत्रपती संभाजीनगर**

E-mail: eemidlabad@gmail.com दूरध्वनी क्र. ०२४०-२३३४१७९

**ई-निविदा सूचना क्र- ०५ सन २०२६-२७ (ऑनलाईन)**

महराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https//mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| १. कामाचे नांव व किमत :- | गंगापूर उपसा सिंचन योजने अंतर्गत वितरण कुंड-१ व पंपगृह-२ येथील कंपाउंड वॉलचे काम. (रु. १२७.४४ लक्ष) जीएसटी वगळून) |
| २. इसारा/बायना रक्कम :- | या कामांची संबंधीत माहिती महाटेंडर या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचने (NIC) मध्ये देण्यात आलेली आहे. |
| ३. काम पूर्ण करण्याचा कालावधी :- | १२ महिने |
| ४. ई-निविदा संचाची किंमत :- | रु.२०००/- + GST १८% एकूण रु. २३६०/- |
| ५. कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग :- | निविदेतील अटी व शर्ती पुर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार |

१. ई निविदा उपलब्ध कालावधी दि. ०५/०८/२०२६ ते दि. १२/०८/२०२६
२. ई निविदा उघडणे दिनांक: १४/०८/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे
३. खालील संकेतस्थळावर ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. https://mahatenders.gov.in
४. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सूचना फलक.
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)

जा.क्र/लपावि-१/लेखा-३/४९१९
लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर
यांचे कार्यालय.
दिनांक:-०४/०८/२०२६

**स्वाक्षरीत/-**
**(उमेश वानखेडे)**
**कार्यकारी अभियंता**
**लघु पाटबंधारे विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर**

डीजीआयपीआर/२०२६-२०२७/२१०७